


# शिल्पकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष अंक 2026

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

परळी

# संघर्षनेता

9881265102 https://www.parlisangharshneta.in संपादक - मोहन व्हावळे

बीड वर्षे- 11 वे | अंक क्र 88 मंगळवार दि. 14 एप्रिल 2026 RNI: MAHMAR/2016/67060


## मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेतकरी गट व वराह पालनाचा समावेश

### पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची माहिती



मुंबई, दि. 13 - राज्यात पशुधनावर आधारित उद्योजकता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना घोषित करण्यात आली आहे. या योजनेत आता मुरघास संयंत्र वाटप योजनेत शेतकरी समूह गटाचा तसेच वराह पालन व्यवसायाचाही समावेश करण्यात आला असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

पशुसंवर्धन विभागाने यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध केला. या निर्णयामुळे मुरघास संयंत्रांच्या माध्यमातून वैरण विकासाला चालना मिळणार असून पशुपालकांसाठी स्थिर व परवडणारा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. विशेषतः समूह पातळीवर काम केल्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन ग्रामीण भागात उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

या निर्णयानुसार आता वैयक्तिक लाभार्थ्यांबरोबरच शेतकरी उत्पादक संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी समूह गट, महिला आर्थिक विकास महामंडळाकडे नोंदणीकृत असलेली समुदाय आधारित संसाधन केंद्रे आणि उमेद नोंदणीकृत प्रभाग संघ यांनाही या योजनेत सहभागी होता येणार आहे. यासाठी संबंधित संस्थांकडे किमान 50 सदस्य, 5 लाख रुपये भागभांडवल आणि मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण पान 3 वर

## राज्यात 15 ते 30 एप्रिल दरम्यान 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा'



अहिल्यानगर : राज्याच्या जलसंपदा विभागामार्फत 15 ते 30 एप्रिल या कालावधीत राज्यभर 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा-2026' साजरा करण्यात येणार आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी ही माहिती दिली.

सिंचन व बिगरसिंचनाची कामे वेळेत पूर्ण करणे, विभागाच्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवणे व उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. या पंधरवड्याची सुरुवात व समारोप प्रत्येक जिल्हास्तरावर संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

या पंधरवड्यादरम्यान कालवा स्वच्छता मोहीम, पाणथळ जमीन मुक्त करण्यासाठी चर योजना, आधुनिक सिंचन पद्धतीद्वारे बंदिस्त नलिका प्रणालीत रूपांतर, पाणीपट्टी वसुली व शेतकऱ्यांच्या पाणी बिलांच्या तक्रारींचे निवारण यांवर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच नदीतून गाळ काढणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण, घरगुती, औद्योगिक व व्यावसायिक पाणी वापराचे जललेखापरीक्षण, धरण व लाभक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे हटविणे व जलसंपदा विभागाच्या मालमत्तेची स्थळ निश्चिती करण्याची कामे प्राधान्याने केली जातील. जागतिक महिला शेतकरी वर्ष असल्याने कार्यक्रमांमध्ये महिलांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदवण्याचे प्रयत्न केला जाणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त 25 ते 29 एप्रिल दरम्यान गोदावरी-नर्मदा जल दिंडीचे पान 3 वर
















# बाबासाहेबांचे संविधान म्हणजे...एकसंघ भारताची पोलादी चौकट

14 एप्रिल हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील प्रेरणादायी पर्व आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र शासन तसेच देशातील विविध संस्थांकडून त्यांच्या कार्याचा गौरव करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. 'विश्वरत्न', 'भारतरत्न', 'घटनाकार" आणि 'भारत भाग्यविधाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यामुळेच त्यांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात त्यांना आदरांजली व्यक्त केली जाते. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतची जनता आजच्या दिवशी महामानवापुढे नतमस्तक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान व त्यावर आधारित लोकशाही जोपर्यंत भारतात आहे, एकसंघ भारतासाठी कायद्याची पोलादी चौकट कायम आहे.त्यांना आदरांजली व्यक्त करताना संविधानाच्या स्वरुपात बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या,न्यायाच्या आणि बंधुतेच्या धाग्यात सर्व भारतीयांना गुंफण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.

**• राष्ट्र प्रथम – बाबासाहेबांचा दृष्टिकोन**

बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्पष्ट होती. संविधान सभेत बोलताना ते म्हणाले होते, "राष्ट्र प्रथम, समाज नंतर आणि व्यक्ती त्यानंतर." स्वतः आयुष्यभर सामाजिक अन्याय सहन करूनही त्यांनी कधीही कोणाबद्दल सूडाची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी अशी राज्यघटना निर्माण केली ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळेल.

आचार्य प्र. के. अत्रे यांनी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लिहिलेल्या आपल्या आदरांजलीत आंबेडकरांना "जुलूमाविरुद्ध उगारलेली वज्राची मुठ" असे संबोधले आहे. ही उपमा त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे अचूक चित्रण करते.

**• भारताच्या अखंडतेची शाश्वती**

स्वातंत्र्यानंतर भारत एकसंघ राहील का याबाबत अनेक पाश्चिमात्य नेत्यांना शंका होती. विविध धर्म, भाषा, जाती यामुळे भारताचे विभाजन होईल, असे भाकीत केले जात होते. विस्टन चर्चिल यांसारख्या नेत्यांनी भारताच्या एकात्मतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. जगातील अनेक नेत्यांनी हा खंडप्राय देश एकत्र राहणार नाही,असे भाकीत केले होते. पाकिस्तानच्या फाळणीनंतर पश्चिम आशिया खंडात धर्माच्या नावावर झालेली अमानुष मानवी कत्तल जगाच्या पुढे होती. भारतातील विविधता, विविध धर्मांचे लोक,धर्मावरुन झालेली विभागणी हे मोठे उदाहरण पुढे होते. त्यामुळे भारताचे भविष्य अंधकारमय वाटणे तत्कालीन परिस्थितीला धरुन होते. मात्र बाबासाहेबांनी अभ्यासाअंती यावर रामबाण उपाय शोधून काढला. ते म्हणजे संविधान, आपली राज्यघटना. संविधान सभेपुढील भाषणात ते म्हणाले होते,स्वातंत्र्य आणि समानता ही मूल्ये बंधूतेशिवाय टिकू शकत नाही.राजकीय लोकशाही यशस्वी तेव्हाच होईल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल.त्यामुळे आजचा दिवस सामाजिक लोकशाही बळकट करण्याचा देखील आहे.भारतीय संविधान सामाजिक आर्थिक, राजकीय,समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय श्रेष्ठ दर्जाचे दस्तावैज आहे.

**• संविधानातील कलम;एकात्मतेचा कणा**

आपण बघतो, भाषा, प्रांत,जाती,अस्मिता यावरुन देशात आजही अनेक आंदोलने सुरु असतात, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आपापल्या भूमिका मांडत असतात. संविधानाचे वैशिष्ट्य म्हणजे संविधान भाषा,प्रांत,जाती,अस्मिता यांचे अस्तित्व मान्य करते.मात्र सोबतच राष्ट्रापुढे सर्व बाबी गौण ठरवते.विधिमंडळ,कार्यपालिका, न्यायपालिका,माध्यमे अशा सर्व स्तंभांना त्यांनी परस्पर पूरक उभे केले आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेला पुढे ठेवूनच सर्व घटकांना आपली वाटचाल करावी लागते."भारतीय संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका या एकमेकांवर नियंत्रण व संतुलन (checks and balances) ठेवतात. कार्यपालिका राज्यघटनेनुसार प्रशासन करते, आणि या सर्वांवर माध्यमे व जनतेचे लक्ष राहते. जबाबदारीची,कार्यवाहनाची,जाणिवांची आणि दायित्वाची अशी मजबूत पोलादी साखळी घटनेच्या माध्यमातून निर्माण झाली आहे.त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार. या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट बजावले आहे की या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट केले, 'हा देश हा अस्मितेवर नव्हे,भावनेवर नव्हे तर सर्वसंमतीवर चालेल.'

शोषित,वंचित,गरीब मागास सर्व घटकांना समतोल विकासाची संधी मिळणे व त्यांच्या न्याय्य हक्काचे रक्षण होणे किती आवश्यक आहे हे बाबासाहेबांना




माहिती होते. त्यामुळेच त्यांनी घटनेमध्ये मूलभूत अधिकार सुस्पष्टपणे अंतर्भूत केले.या अधिकारामुळे कायद्यापुढे सर्व समान आणि सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळाले आहे.

**• समानतेचा अधिकार (कलम 14 ते 18)**

बाबासाहेब आंबेडकरांनी मूलभूत अधिकारांमध्ये 14 ते 18 या कलमांमध्ये
सर्व नागरिक कायद्यापुढे समान असतील, जात, धर्म, वंश,लिंग किंवा जन्मस्थानावरुन भेदभावास मनाई,अस्पृश्यता अमान्य,आणि नियुक्तीची समान संधी,तसेच देशाप्रतीची बांधीलकी या बाबी नमूद केल्या. एका सामान्य स्त्री-पुरुषाला देशाचा प्रधानमंत्री, राष्ट्रपती बनण्याचा अधिकार देतानाच भेदभावाला त्यांनी या समानतेच्या अधिकाराने कायदेशीर बंधन घातले आहे.

*स्वातंत्र्याचा अधिकार (कलम 19 ते 22)*

ज्यांना हजारो वर्ष शिक्षण, वाणी, अधिकार आणि सहभागांपासून जाती धर्माच्या आधारावर संधी नाकारली गेली. त्या सर्वांना स्वतंत्र भारतात अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याचे कार्य बाबासाहेबांमुळे झाले. राज्यघटनेतील कलम 19 प्रत्येक भारतीयाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते. भारताचा नागरिक कोणत्याही राज्यामध्ये मुक्त संचार करु शकतो. भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा अधिकार त्याला मिळालेला आहे.जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण,शिक्षणाचा हक्क,न्यायालयात दाद मागण्याचा हक्क,विनाकारण स्थानबद्ध न करण्याचा हक्क अशा अनेक मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे.

**• शोषणाविरुद्ध संरक्षण (कलम 23-24)**

हजारो वर्षाची वेठबिगारी, सालदारी, बिनपगारी शोषणाला बळी पडलेल्या शोषितांना थेट घटनेच्या माध्यमातूनच बाबासाहेबांनी न्याय दिला. भारतीय राज्यघटनेच्या कलम 23 आणि 24 मध्ये शोषणाविरुद्ध संरक्षण दिले आहे.या कायद्यामुळे स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात माणसांना गुलाम ठेवणे, वेठबिगारी सारखे काम करुन घेणे, बिनपगारी सालदारी करणे, सक्तीने सेवा करायला सांगणे, धर्म, वंश, जात यावरुन काम करुन घेणे, बळजबरीची मजुरी करुन घेणे, 14 वर्षाखालील कोणत्याही बालकाकडून काम करुन घेणे, अर्थात बालमजुरीवर बंदी घालण्यात आली.ही फार मोठी क्रांती होती आणि याचा कायदा बनल्यामुळे हजारो सालाच्या गुलामगिरीतून मागासवर्गीयांची, शोषितांची मुक्तता झाली.

**• धर्मस्वातंत्र्य (कलम 25 ते 28)**

धार्मिक चालीरीती व रुढीपरंपरांच्या नावावर शतकानुशतके चाललेल्या शोषणाला घटना लागू झाल्यानंतर कायद्याच्या चौकटीने कायमचा पायबंद बसला. सोबतच सर्वांना आपापला धर्म पाळण्याची मुभा देण्यात आली. मात्र सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्याला घातक नसेल अशा वर्तनाची हमी कायद्याने घेण्यात आली. प्रत्येक धर्माला धार्मिक विधी, धार्मिक व्यवहाराची व्यवस्था, सांस्कृतिक शैक्षणिक हक्क प्रदान करण्यात आले.धार्मिक शिक्षण, धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य मिळाले. भारतातील विविध जातीधर्मांच्या लोकांना राज्यघटनेने हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्थेच्या अधीन राहून पाळण्याचे अधिकार या कलमाने दिले. भारतीय समाजावर असणारा धर्माचा,धार्मिक चालीरीतींचा पगडा, याचा अभ्यास करुन बाबासाहेबांनी मूलभूत हक्कांमध्ये हे स्वातंत्र्य बहाल केले आहे. यासोबतच त्यांनी कलम 29,30 अन्वये अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आपली भाषा व संस्कृती जपण्याचा अधिकार दिला आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातला कोणताही नागरिक त्याच्यावरील अन्यायासाठी कलम 32 अन्वये हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे.

**• सर्वांसाठी न्याय – व्यापक दृष्टी**

बाबासाहेब स्वतः वंचित समाजातून आले होते, पण त्यांनी फक्त मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्व समाजासाठी न्याय व्यवस्था उभी केली.

अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान संधी,सामाजिक न्यायासाठी कायदेशीर संरक्षण त्यांनी दिले. सोबतच कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली.

**• संविधान सभेला दिलेले तीन इशारे**

संविधान सभेच्या निर्मितीत अनेक महान नेत्यांचे, मान्यवरांचा हातभार होता. मात्र तरीही बाबासाहेबांनाच घटनेचे शिल्पकार संबोधले जाते. कारण, त्यांनी घटनेच्या अंमलबजावणीची दिशा आणि सूत्रे स्पष्टपणे अधोरेखित केली.त्यांची संविधान सभेतील भाषणेही तेवढी बोलकी आहेत. भारतीय संविधान सामाजिक, आर्थिक, राजकीय, समानता देण्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम अशी घटना आहे मात्र या घटनेचा वापर कोण करणार ? कसा करणार ? आणि किती प्रामाणिकपणे करणार ? यावरच घटनेच्या अंमलबजावणीचे फलित अवलंबून असेल असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी घटना निर्माण करणाऱ्या संविधान सभेपुढे बोलताना तीन महत्त्वाचे इशारे दिले होते...

ते म्हणाले होते,देशातील सामाजिक असमानता दूर होणे आवश्यक आहे.आम्ही सर्वप्रथम भारतीय होणे आवश्यक आहे.त्यांनी परस्पर बंधुतेवर भर दिला.बंधुता म्हणजे राष्ट्रातील सर्व लोकांमध्ये बंधूभाव आणि एकतेची भावना निर्माण करणे होय.

त्यांनी दुसरा इशारा दिला होता आर्थिक विषमतेचा. देशातील सर्व नागरिकांचा समतोल आर्थिक विकास होणे आवश्यक आहे, कारण आर्थिक विषमता श्रीमंत-गरीब दरी वाढवते. ही दरी वाढली तर असंतोष वाढेल.

त्यांचा तिसरा इशारा होता. सांप्रदायिकता वाढायला नको. सांप्रदायिकता म्हणजे विशिष्ट धर्माला अधिक महत्त्व देणे. भारत हा विविध धर्मांचा देश आहे.कोणत्याही धर्माचा द्वेष, वाढायला नको. धर्माधारित द्वेष राष्ट्राच्या एकात्मतेला तडा देईल. हे इशारे आजही तितकेच महत्त्वाचे आहेत.

**• घटना निर्मिती – राष्ट्रनिर्मितीचा पाया**

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर त्यात राष्ट्रनिर्मितीचा स्वयंस्पष्ट आराखडा आहे. बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून संघराज्य व्यवस्था मजबूत केली केंद्र आणि राज्य यांच्यात संतुलन ठेवले. न्यायव्यवस्थेला स्वातंत्र्य दिले.यामुळे भारत एक अखंड आणि सक्षम राष्ट्र बनला.

**• संविधान टिकले तर लोकशाही टिकेल**

महामानवाला अभिवादन करताना प्रत्येक भारतीयाने ही शपथ घेणे गरजेचे आहे की, संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. आणि राजकीय लोकशाही तेव्हाच टिकेल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. आपण संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात आहोत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक भारतीयाने संविधान समजून घेणे आवश्यक आहे. संविधानाचे पालन करणे आवश्यक आहे. आपल्या अधिकारांसोबत भारताचा नागरिक म्हणून आपली कर्तव्येही ओळखणे आवश्यक आहे.

बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून एकसंघ, न्याय्य आणि प्रगत भारत उभा केला. जगाला वाटत होते की भारत टिकणार नाही, पण आज भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे,जगातील महाशक्ती म्हणून उदयास येत आहे. हे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे.

14 एप्रिलच्या त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्यापुढे नतमस्तक होताना... चला भारतीय म्हणून आपण एकच संकल्प करुया...संविधानाचा सन्मान करुया, समानतेचे,बंधुत्वाचे मूल्य जपूया सर्वप्रथम एक भारतीय बनूया आणि एकसंघ भारत अधिक मजबूत करुया... हीच महामानव बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर***
**9702858777**

# भिमाई

**सारं काही आहे तुझ्या पाई**
**तुच बाप आणि तुच आई..**


**दारो दारी भीक मागत असतो भुकेपाई**
**सडत राहीले असते मडे सरणापाई..**

**काय म्हणुनी जगलो असतो माणुसकीपाई**
**रोज मेलो असतो गुलामीत स्वातंत्र्यापाई..**

**कोणीही शिकार केली असती सतेपाई**
**चामडे लटकवले असते भिंतीवर शोभेपाई...**

**अगणित जळलास आमच्या साठी पोटच्या लेकरापाई**
**म्हणुनी म्हणतो तुच बाप आणि तुच आई ..**

**. कवी**
**पप्पू धोंडीराम रोडे**
**मुंबई**
**9604868183**




# परिथिती

विसरुन गेलात आपण पूर्वीचा भारत
सोन्याचा धूर निघत असे म्हणे
आजच्या या युगात सोने घेणे झाले कठीण
गोर गरीब लोकांना कसे करावे लग्न सोहळे ,
वाढती महागाई ,बेरोजगारी,वाढती गुन्हेगारी,
यावर विरोधक पण का काही बोलत नाही,
चंद्र प्रकाशा एवढं स्वच्छ होता माझा भारत देश ,
आजची परिस्थिती खरी जाणून घ्यारे
महागाईने कंबरडे मोडले येथील गरीब जनतेचे
उद्योग पती झाले मात्र मालामाल ,
कधी सुधारेल भारत देशाची शान ,
वाटेल आम्हास त्याचा अभिमान,
होईल का माझ्या शिवाजी राजेंच्या राज्यातले सारे,
सुख शांती समृद्धी आणि समाधान ,
आठवावे राजेचे न्याय,जणते वरील प्रेम ,
आज कोणीच नाही कोणाचे फक्त पैसा आणि काय..



**कवी**
**विजय धाईजे**
**( MA राज्यशास्त्र b,ed )**




# मनूर मध्ये तब्बल 2महिन्या पासून पाणीच नाही लोकांचे बेहाल ग्रामपंचायत नावाला खूळखुळे वाजवत आहे आमदार साहेब लक्ष द्या* आझाद क्रांती सेना

माजलगाव | प्रतिनिधी



शहरापासून अवघ्या अर्ध्या किलोमीटरवर असणाऱ्या मनुर गावाची हेळसांड. लाखो रुपये खर्चून जलजीवन मशीन योजनेच्या नावाखाली गावाचा बोऱ्या वाचून टाकला. तब्बल दोन महिन्यापासून ते पण भर उन्हाळ्यामध्ये पाण्या वाचून दलित वस्तीचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. तसेच मनूर आराफत मोहल्ला,मनूर गावात पिण्याच्या पाण्यावाचून बेहाल होतं आहेत. येथिल ग्रामपंचायत चे ग्रामसेवक, सरपंच, सदस्य, उपसरपंच हे फक्त टक्के वारी वर कामे करतात. माजलगावचे भाग्यविधाते आ. प्रकाश दादा आपण या गावाला भरभरुन देऊनही दलित वस्ती मध्ये अजून ही बऱ्याच ठिकाणी पाण्याचे बोर, हातपप नाहीत. जिथे आवश्यकता नसताना तिथे व्यवस्था केली जाते. पण जिथे माणसं राहतात तिथे पाण्याची सोय नाही रस्ते नाहीत . आमदार साहेब ग्रामपंचायत आपल्या ताब्यात असलेल्या त्या ग्रामपंचायत वर नियंत्रण कोणाचे ठेवण्यात आले आहे .

मनूर ग्रामपंचायत चा कारभार " जिधर माल, उधर काम "अशी गत आहे. ग्रामसेवक हे प्रशासकीय असताना त्यांचं पण या गंभीर बाबी कडे लक्ष नाही. तब्बल 2महिण्यापासून मनूर गाव ते पण अश्या कडक उन्हात पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे. जर मनूर ग्रामपंचायत ने प्रश्न तात्काळ सोडवला नाही,तर प्रशासकीय सर्व कामे व त्याची निविदा कसे कामे जिथे मानव वस्ती रस्ते, नाल्या पाण्या वाचून वंचित असलेले सर्व ड्राफ्ट घेऊन थेट आमदार साहेब यांच्या कडे या दलबदलू लांडग्या ची तक्रार करणार असल्याचे आझाद क्रांती सेना ता. प्रमुख अशोक ढगे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# छत्तीसगड जुनिअर चॅम्पियनशिप : सुमितकुमारची सुवर्ण कामगिरी



माजलगाव ( अनंत घडसिंगे ) :
छत्तीसगड येथे ता. 11 एप्रिल रोजी नुकत्याच राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धा पार पडल्या. सदरील राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप स्पर्धेत 70 किलो वजन गटात शहरालागत असणाऱ्या पुनर्वसित शेलापुरी येथील अष्टपैलू पैलवान सुमितकुमार अप्पासाहेब भारस्कर याने शेवटच्या अंतिम सामन्यात दमदार खेळी करत हरियाणा येथील मल्लास पराभूत करुन सुवर्णपदकावर आपल नाव कोरत सुवर्ण कामगिरी केली. सदरील स्पर्धेसाठी कोच नरेंद्र कुमार, समीर देसाई, अनिरुधसर, कांबळे सर यांनी मार्गदर्शण केले.अतिशय संघर्षातून कुठलीही आखीव रेखीव पार्शवभूमी नसताना पैलवान सुमितकुमार भारस्कर याने आपल्या जिद्दीच्या जोरवार प्रचंड मेहनतीने विविध स्पर्धेत अनेक सुवर्ण पदकांची कमाई केली असून, सध्या सुमितकुमार हा रुस्तुम ए हिंद पै अमोल बचूडे कुस्ती संकुल येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत असून, तो सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे.तसेच लवकरच तो आपल्या देशासाठी इंटरनॅशनल खेळणार असून,आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याला प्रतिनिधित्व मिळणार असल्याने या सुवर्ण कामगिरी बद्दल पैलवान सुमिकुमारचे सामाजिक, राजकीय तसेच विविध समाज माध्यमातून त्याच्यावर शुभेच्छा चा वर्षाव होत असून, सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

# आधुनिक भारताचे शिल्पकार या भव्य देखाव्याचे आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते उदघाटन

## परळी भीमवाडी चौकात देशाच्या एकसंघ स्थायीभाव देखाव्याचे ठरले भीमसैनिकांचे आकर्षक









परळी प्रतिनिधी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्ताने येथील भिमवाडी चौकात आधुनिक भारताचे शिल्पकार या भव्य देखाव्याचे आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थित उदघाटन करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते भैयासाहेब आदोडे यांच्या संकल्पनेतुन व स्वखर्चाने प्रतिवर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देश व समाजाप्रती दिलेल्या विचारांचे संदेश भव्य देखाव्याच्या माध्यमातून स्वखर्चाने प्रदर्शित केला जातो याही वर्षी बाबांच्या 135व्या जयंती निमित्ताने शहराच्या भिमवाडी चौकात आधुनिक भारताचे शिल्पकार या शिर्षक घेऊन स्थायी भव्य देखावा उभारण्यात आला आहे.

या देखाव्याचे माजी मंत्री आ.धनंजय मुंडे साहेबांच्या हस्ते रविवार दि.12 एप्रिल रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी परळी शहराच्या प्रथम नागरिक सौ.पद्मजाताई बाजीराव धर्माधिकारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तर प्रमुख उपस्थिती

उप नगराध्यक्ष राजा खान,माजी उप नगराध्यक्ष शकील भाई कुरेशी, पाणी पुरवठा सभापती रविंद्र (पापा) सेठ गित्ते, श्रीकृष्ण भावड्या कराड, नगरसेवक भीमराव डावरे,अमोल मुरकुटे, अदी मान्यवर उपस्थीत होते.

दरम्यान उपस्थित मान्यवरांच्या चे आभार व्यक्त करताना सामाजिक कार्यकर्ते भैयासाहेब आदोडे यांनी सांगितले कि,भारतातील विविध जाती,परंमपरेला, धर्माला एकसंघ या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या माध्यमातून केले आहे याच संदेशाच्या माध्यमातून हा देखावा निर्माण केला आहे. यामध्ये संविधान हातात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हुभी प्रतिकृती,भारतीय जनतेने आपले लोक प्रतिनिधी निवडून देतात ज्या सभागृहात देशाचे भवितव्य व कायदे केले जातात ती संसद,न्याय दान करणाऱ्या सुप्रीम कोर्टाची प्रतिमा व याला एकसंघ ठेवण्यासाठीचे भारतीय राज्यघटना अशी दृश्य भव्य स्वरुपात उभारण्यात आले असल्याचे भैयासाहेब आदोडे यांनी यावेळी सांगितले.याप्रसंगी जेष्ठनेते विश्वनाथ गायकवाड,जेष्ठ नेते महादेवरी ताटे,वंचित चे नेते मिलिंद घाडगे,सुनील चिकाटे,राहुल गोदाम, रमेश रायभोले, राजेभाऊ मुंडे, विजय व्हावळे, नितीन व्हावळे, प्रवीण दहिवाडे, सचिन गायकवाड,ओम दहिवाडे, विशाल रायभोळे, गौतम दहिवाडे, उत्तम घाटे, आदिल पठाण, पप्पू खान, नोमन सय्यद, बबलू पठाण, सुमित रायभोळे, वैभव भोकरे, आकाश गायकवाड, आदित्य वंजारे, आकाश कांबळे, गणेश गवारे, सोनू ताटे, धम्मापाल सोनकांबळे, अनिकेत ढगे, सलामन पठाण अदी भिमवाडी मित्र मंडळाचे नेते,पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थितीत होते.

## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्त आयोजित केलेल्या दिव्यांग सहाय्यक पोर्टल मोफत नोंदणी शिबिराचा लाभ घ्यावा -डॉ. संतोष मुंडे

### भविष्यातील 15 हजार रुपयांच्या साहित्यासाठी ही नोंदणी आवश्यक

परळी: (प्रतिनिधी) दिनांक 14 एप्रिल भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती निमित्त दिव्यांग सहाय्यक पोर्टल मोफत 8 दिवसीय नोंदणी शिबिराचे आयोजन श्रीनाथ हॉस्पिटल परळी वैजनाथ येथे करण्यात आलेले आहे.

दिनांक 14 एप्रिल ते 21 एप्रिल असे आठ दिवस सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 वाजे पर्यंत या दिव्यांग सहाय्यक पोर्टल मोफत नोंदणी शिबिरामध्ये दिव्यांगांची नोंदणी करण्यात येणार आहे अशी माहिती या शिबिराचे मुख्य आयोजन महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्याचे माजी कृषिमंत्री आ.धनंजय मुंडे तसेच मा.ना.पंकजाताई मुंडे व दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे मंत्री ना.अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांच्या कल्याणासाठी प्रत्येक क्षणी प्रथम प्राधान्याने प्रयत्न करणारे तसेच विविध सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर राहून विविध आरोग्य शिबिरे व दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबवणारे प्रसंगी दिव्यांगाच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरुन आंदोलन करणारे,

दिव्यांगांचे कैवारी अशी ओळख असणारे महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष तथा धनंजय मुंडे आरोग्य मित्र योजनेचे अध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांच्या प्रयत्नातूनच या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे ज्यामुळे दिव्यांगांच्या जीवनात एक आर्थिक आधाराचा आणि आनंदाचा प्रकाश झोत येणार आहे.

या शिबिरांतर्गत दिव्यांग सहाय्यक पोर्टल मध्ये नोंदणी करणाऱ्या प्रत्येक दिव्यांग नागरिकाला विविध शिष्यवृत्ती योजना, सहाय्यक उपकरणे, स्वयंरोजगार कर्ज,प्रशिक्षण आणि रोजगार, आरोग्य विमा सुविधा तसेच महामंडळ योजना अशा विविध योजनांचा लाभ घेता येईल अशी माहिती प्रसार माध्यमांशी बोलताना देण्यात आली

दरम्यान ज्या दिव्यांग नागरिकांची या दिव्यांग सहाय्यक पोर्टल मध्ये नोंदणी होईल त्यांनाच भविष्यातील पंधरा हजार रुपये किमतीच्या साहित्य वाटपाचा आणि विविध योजनांचा लाभ घेता येईल अशीही महत्वाची सूचना देण्यात आली.

तरी परिसरातील दिव्यांग बांधवांनी आज पासून सुरु होणाऱ्या या मोफत दिव्यांग सहायक पोर्टल नोंदणी शिबिरामध्ये सहभागी होऊन श्रीनाथ हॉस्पिटल परळी वैजनाथ येथे सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत उपस्थित राहून आपल्या नावाची नोंदणी करावी असे आव्हान या शिबिराचे मुख्य आयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी केले आहे.

## ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली

## • सुनील राणे व शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत आज परळीत मतदारयादी पुनर्विलोकन मार्गदर्शन बैठक

**लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे - प्रा. पवन मुंडे**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) परळी विधानसभा करिता सखोल मतदार यादी पुनरावलोकन (SIR) मार्गदर्शन बैठक उद्या 14 एप्रिल रोजी भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत परळीत आयोजित करण्यात आली आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या बैठकीस लोकप्रतिनिधी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एसआयआर बी.एल.ए. - 1 विधानसभा प्रमुख तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

मंगळवार दि. 14 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता अक्षता मंगल कार्यालय येथे होणाऱ्या या महत्वपूर्ण बैठकीस मार्गदर्शन करण्यासाठी भाजपाचे प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख उपस्थित राहणार आहेत. सखोल मतदार यादी पुनरावलोकन यावर मान्यवर सविस्तर मार्गदर्शन व शंका निरसन करणार आहेत. तरी या बैठकीला मतदार संघातील सर्व शहर व ग्रामीण मंडळ अधिकारी, नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य,



पक्षाचे सुपर वोरिअर्स, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख शहर, तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन एसआयआर बी.एल.ए. - 1 विधानसभा प्रमुख तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

## सुनील राणे व शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत आज परळीत मतदारयादी पुनर्विलोकन मार्गदर्शन बैठक

### बुथप्रमुख, शक्तीप्रमुख व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे - अनिश अग्रवाल

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) सखोल मतदार यादी पुनरावलोकन (SIR) मार्गदर्शन बैठक उद्या 14 एप्रिल रोजी भाजपचे प्रदेश सरचिटणीस सुनील राणे व जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत परळीत आयोजित करण्यात आली आहे. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या बैठकीस बुथप्रमुख, शक्तीप्रमुख व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपचे कोषाध्यक्ष अनिश अग्रवाल यांनी केले आहे.

मंगळवार दि.14 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता अक्षता मंगल कार्यालय येथे होणाऱ्या या महत्वपूर्ण बैठकीस मार्गदर्शन करण्यासाठी भाजपाचे प्रदेश सरचिटणीस सुनिल राणे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख उपस्थित राहणार आहेत. सखोल मतदार यादी पुनरावलोकन यावर मान्यवर सविस्तर मार्गदर्शन व शंका निरसन करणार आहेत. तरी या बैठकीला शहरातील बुथप्रमुख, शक्तीप्रमुख, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजपचे शहर कोषाध्यक्ष अनिश अग्रवाल यांनी केले आहे.







पान 1 वरुन

पूर्ण असणे आवश्यक ठेवण्यात आले आहे.मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन यांचा समावेश आहे. आता या निर्णयानुसार वराह पालनाला चालना देण्यासाठी 'वराह पालन गट वाटप योजना' समाविष्ट करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत 5+1 वराह गट, विमा आणि आवश्यक पायाभूत सुविधा यांचा समावेश असलेला सुमारे 2.08 लाख रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सर्वसाधारण लाभार्थ्यांना 50 टक्के तर अनुसूचित जाती-जमातींना 75 टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेत सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील भूमिहीन, अल्पभूधारक, महिला बचत गट आणि सुशिक्षित बेरोजगारांना प्राधान्य देण्यात येणार असून महिलांसाठी 50 टक्के तर दिव्यांगांसाठी 5 टक्के आरक्षण लागू राहणार आहे. लाभार्थ्यांना पशुपालनाचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात आले असून स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली खरेदी प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

उद्योजकता विकास योजनेअंतर्गत 4 टक्के व्याज सवलत योजना ही शेळी/मेंढी/गाय/म्हैस/कुक्कुटपालन या पशुपालन व्यवसायाबरोबरच वराह पालन व्यवसायालाही लागू करण्यात आली आहे. यामुळे पशुपालन क्षेत्रात गुंतवणूक वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची अपेक्षा मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

---------------------------------------

आयोजन केले जाणार आहे. पंधरवड्यात दररोज विविध घटकांसाठी विशेष मोहिमा, उपक्रम व जलसंपदा अदालत आयोजित केली जाईल. यामध्ये अधिकारी प्रशिक्षण, जल पुनर्भरण, शेतकरी संवाद, भूसंपादन अडचणी निराकरण, कालवा संयुक्त पाहणी, नदी प्रदूषण नियंत्रण, कृषी विभागासोबत पीक पद्धतीबाबत कार्यशाळा, महसूल विभागाच्या मदतीने जमिनीचा सातबारा उतारा अद्ययावत करणे व आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन अशा विविध विषयांवर भर दिला जाईल. शेतकरी व गरजू नागरिकांच्या शंकांचे निरसन करून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक अभियंता कार्यालयात मदत कक्ष सुरु करण्यात येणार आहे. तसेच शासकीय योजनांची माहिती देणाऱ्या लघु चित्रफिती तयार करुन तज्ज्ञांची व्याख्याने व माहितीपत्रकांद्वारे व्यापक प्रसिद्धी केली जाईल.

कार्यक्रमांच्या आयोजनासाठी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून संनियंत्रण करावे व यात इतर प्रशासकीय विभागांचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था, जलतज्ज्ञ व सर्व लोकप्रतिनिधींना आमंत्रित करावे, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.




वडवणी - पुसरा येथील ज्येष्ठ नागरिक रामा तांदळे उर्फ दामू अण्णा यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे ते 65 वर्षाचे होते त्यांच्या पश्चात मुलं, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक संघर्ष नेता परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.



• माजलगाव ( अनंत घडसिंगे ) : कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालियामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे सचिव हरिभाऊ सवणे साहेब व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव*

# बाबासाहेबांच्या 'जातिभेदाचा नाश' या क्रांतिकारी ग्रंथातील विचार

डॉ. भारत कऱ्हाड




**जयंती निमित्ताने विशेष लेख**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'अनिहिलेशन ऑफ कास्ट (जातिभेदाचा नाश)' हा ग्रंथ भारतीय समाजातील जातिव्यवस्थेच्या मुळावर प्रहार करणारा एक क्रांतिकारी आणि वैचारिक दस्तऐवज आहे. सन 1936 मध्ये लिहिलेला हा ग्रंथ मूळतः जातपात तोडक मंडळ या संस्थेच्या व्याख्यानासाठी तयार करण्यात आला होता; मात्र त्यातील विचारांच्या तीव्रतेमुळे ते व्याख्यान रद्द करण्यात आले आणि पुढे हा ग्रंथ म्हणून प्रकाशित झाला. ही घटना स्वतःच या ग्रंथाच्या परिवर्तनवादी विचारांची ताकद दर्शवते.

या ग्रंथाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा संक्षिप्त पण प्रभावी आकार. मूळ मजकूर साधारण 40 ते 60 पानांचा असला, तरी नंतरच्या विस्तारित आवृत्त्यांमध्ये प्रस्तावना, परिशिष्टे आणि विशेषतः महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील वैचारिक संवाद समाविष्ट झाल्यामुळे या ग्रंथाची पानसंख्या 100 ते 150 पर्यंत वाढते. त्यामुळे हा ग्रंथ केवळ एक व्याख्यान न राहता एक व्यापक वैचारिक चर्चा बनतो.

या ग्रंथातील मुख्य विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे जातिव्यवस्थेची चिकित्सा आणि तिचे निर्मूलन. आंबेडकर स्पष्टपणे सांगतात की, जातिव्यवस्था ही मानवी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांच्या विरोधात उभी असलेली अन्यायकारक रचना आहे. त्यामुळे ते ठामपणे मांडतात की, "जातिभेद नष्ट केल्याशिवाय लोकशाही टिकू शकत नाही."

या ग्रंथात आंबेडकरांनी जातिव्यवस्थेच्या टिकून राहण्याची कारणे शोधली आहेत. त्यांच्या मते, जातिव्यवस्था धर्मग्रंथांच्या आधारावर टिकून आहे. त्यामुळे ते सांगतात की, समाजसुधारणा केवळ बाह्य स्वरुपात करून उपयोग नाही; जोपर्यंत धर्माच्या तत्त्वांमध्ये बदल होत नाही, तोपर्यंत खरे सामाजिक परिवर्तन शक्य नाही. म्हणूनच ते "धर्मसुधारणा" ही सामाजिक क्रांतीची पूर्वअट मानतात.

आंबेडकरांनी या ग्रंथात सुधारकांच्या भूमिकेवरही कठोर टीका केली आहे. त्यांच्या मते, अनेक सुधारक जातिव्यवस्थेचे दुष्परिणाम कमी करण्याचा प्रयत्न करतात; परंतु तिचे मूळ नष्ट करण्याचा प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे ते स्पष्ट करतात की, सामाजिक सुधारणा अपुरी आहे; जातिव्यवस्थेचे पूर्ण निर्मूलनच आवश्यक आहे.

या ग्रंथातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे धर्म आणि समाज यांचे नाते. आंबेडकरांच्या मते, समाजाची रचना धर्मावर आधारित असते आणि त्यामुळे धर्मातील विषमता समाजातही प्रतिबिंबित होते. म्हणूनच ते धर्मातील असमानतेवर प्रहार करतात आणि समानतेवर आधारित नव्या सामाजिक रचनेची मागणी करतात.

या संदर्भात त्यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांवरही चिकित्सक टीका केली आहे. गांधीजी अस्पृश्यतेविरुद्ध होते, परंतु त्यांनी जातिव्यवस्थेचा संपूर्ण त्याग केला नाही, ही बाब आंबेडकरांना मान्य नव्हती. या वैचारिक संघर्षातून त्या काळातील दोन वेगळ्या सामाजिक दृष्टिकोनांचा संघर्ष स्पष्टपणे दिसून येतो.

आंबेडकरांच्या मते, जातिव्यवस्थेमुळे समाजात बंधुतेचा अभाव निर्माण होतो. लोक एकमेकांपासून दूर राहतात आणि एकात्मता निर्माण होत नाही. परिणामी, राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया कमकुवत होते. हा विचार आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचा आहे.

या ग्रंथाचा त्या काळात मोठा प्रभाव पडला. समाजातील वंचित घटकांना या ग्रंथातून बौद्धिक आधार मिळाला आणि सामाजिक चळवळींना नवी दिशा मिळाली. अनेकांनी या विचारांचे स्वागत केले, तर काहींनी त्यावर टीका केली. तरीही, या ग्रंथाने समाजात विचारमंथन निर्माण केले.

आजच्या काळात हा ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी आणि समाजासाठी अत्यंत उपयुक्त आहे. संविधानाने समानतेची हमी दिली असली, तरी सामाजिक स्तरावर जातीय भेदभावाचे अंश अजूनही आढळतात. अशा वेळी या ग्रंथातील विचार विद्यार्थ्यांना समाज समजून घेण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या ग्रंथाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तो विचार करण्याची सवय लावतो. आंबेडकरांनी या ग्रंथात प्रश्न विचारण्याची पद्धत शिकवली आहे. त्यामुळे हा ग्रंथ केवळ अभ्यासक्रमापुरता मर्यादित राहत नाही, तर तो बौद्धिक विकासाचे साधन बनतो.

चिकित्सक दृष्टिकोनातून पाहिले असता, या ग्रंथाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची निर्भीडता आणि तर्कशुद्धता. काही वाचकांना त्यांच्या टीकेची तीव्रता कठोर वाटू शकते, परंतु ती त्या काळातील वास्तवाच्या पार्श्वभूमीवर समजून घेतली पाहिजे.

एकंदरीत, 'जातिभेदाचा नाश' हा ग्रंथ भारतीय समाजाच्या मुळावर प्रहार करणारा आणि परिवर्तनाची दिशा दाखवणारा एक अमूल्य वैचारिक दस्तऐवज आहे. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी या ग्रंथातून स्पष्ट केले की, समाज बदलायचा असेल तर त्याच्या मुळावर प्रश्न विचारणे आवश्यक आहे—आणि हाच या ग्रंथाचा खरा संदेश आहे.


**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# चला, बाबासाहेबांच्या विचाराचा वारसा जपू या ! - आत्मसात करू या !

भारतीय समाजाला समता, न्याय आणि बंधुता यांचा खरा अर्थ शिकवणारे महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी आपल्या आयुष्यभर शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायासाठी संघर्ष केला. आजच्या काळात त्यांच्या विचारांची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. म्हणूनच आपण सर्वांनी त्यांच्या विचारांना केवळ वाचून न थांबता ते आपल्या जीवनात उतरवले पाहिजेत.

बाबासाहेबांनी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा मंत्र दिला. शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे, हे त्यांनी पटवून दिले. त्यामुळे प्रत्येकाने शिक्षणाला प्राधान्य देऊन स्वतःचा आणि समाजाचा विकास साधला पाहिजे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अन्याय यांना विरोध करणे हेच बाबासाहेबचे विचाराचा वारसा जपणे होय अस मला निष्ठेने सांगा वसे वाटते. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येकाला समान हक्क दिले. परंतु हे हक्क जपण्यासाठी आपण कर्तव्यदक्ष नागरिक बनणे आवश्यक आहे ते जपणे प्रत्येक भारतीयांची आपली जबाबदारी आहे. समाजात प्रेम, सहिष्णुता आणि बंधुता वाढवणे ही आपली जबाबदारी आहे. कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक देणे, हेच त्यांच्या विचारांचे खरे पालन आहे.

आजच्या तरुणांनी बाबासाहेबांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा. स्वाभिमानाने जगणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि सतत प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणे, हे प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे.



चला, आपण सर्वजण मिळून बाबासाहेबांचे विचार आत्मसात करुया आणि एक समतामूलक, न्याय्य व प्रगत समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करुया.

भारतीय समाजव्यवस्थेला समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचे भक्कम अधिष्ठान देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरेच महामानव होते. त्यांनी केवळ संविधानाची निर्मिती केली नाही, तर समाजातील विषमता, अन्याय आणि अज्ञान यांच्याविरुद्ध लढा देऊन लाखो लोकांना नवजीवन दिले. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि अनेकदा असमानतेने ग्रासलेल्या जगात बाबासाहेबांचे विचार जोपासणे आणि आत्मसात करणे ही केवळ गरज नाही, तर आपली जबाबदारी आहे.

आजच्या काळातील गरज : आजही समाजात भेदभाव, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांचे अस्तित्व दिसून येते. तंत्रज्ञान प्रगत झाले असले तरी मानसिकता बदलणे बाकी आहे. अशा वेळी बाबासाहेबांचे समतेचे, न्यायाचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे विचार आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या विचारांमुळे आपण अधिक जागरूक, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनू शकतो.

आत्मसात करण्याची प्रक्रिया : विचार केवळ वाचून किंवा ऐकून उपयोग होत नाही; ते आचरणात आणले पाहिजेत.

* शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणे
* सर्वांना समानतेने वागवणे
* अंधश्रद्धेला विरोध करणे
* संविधानाचे मूल्य जपणे
* समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे

हे सर्व कृतीतून केल्यासच बाबासाहेबांचे विचार आपल्या जीवनाचा भाग बनतील.

युवकांची भूमिका : -

आजचे युवक हे उद्याचे भविष्य आहेत. त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा अभ्यास करून समाजात सकारात्मक बदल घडवावा. सोशल मीडियाचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता ज्ञान प्रसारासाठी करणे, समाजकार्यामध्ये सहभागी होणे आणि नैतिक मूल्यांचे पालन करणे ही युवकांची जबाबदारी आहे.

"बाबासाहेबांचे विचार हे केवळ पुस्तकांत मर्यादित न ठेवता, आपल्या आचरणात आणणे हीच खरी त्यांना आदरांजली आहे. चला, आपण सर्वजण त्यांच्या विचारांचे जोपासण करूया, आत्मसात करुया आणि एक समतामूलक, न्याय्य व प्रगत समाज घडवूया."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे जोपासणे म्हणजे स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवणे आणि समाजातही परिवर्तन घडवणे. आजच्या काळात हीच खरी गरज आहे. आपण प्रत्येकाने आपल्या जीवनात त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केला, तर एक सशक्त, सुजाण आणि समतावादी भारत निर्माण होईल.



**प्रा. डॉ. माधव न. रोडे**
**संशोधक : भौतिक शास्त्र विभाग प्रमुख ,**
**वैद्यनाथ कॉलेज, परळी - वैजनाथ ,**
**जिल्हा - बीड**

# महामानवाचा वज्रनिर्धार : 'संकल्प भूमी' ते 'संविधान निर्मिती'



विश्वरत्न, भारतरत्न, घटनेचे शिल्पकार, शिक्षणतज्ज्ञ आणि समतेचे पुजारी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन! त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा जागर मांडणारा हा एक छोटासा लेखन प्रपंच.

अन्यायाविरुद्ध पेटलेली मशाल

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा संदेश दिला नाही, तर तो स्वतःच्या आयुष्यात जगून दाखवला. "अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा अधिक दोषी असतो," ही विचारधारा त्यांनी समाजात रुजवली. वंचित आणि दुर्लक्षित पिढीला त्यांनी अन्यायाविरुद्ध लढण्याचे 'बाळकडू' दिले. ते म्हणत, "व्यक्तीने कोणत्या कुटुंबात किंवा जातीत जन्म घ्यावा हे त्याच्या हातात नसते, पण तिथली परिस्थिती बदलण्याचे सामर्थ्य मात्र नक्कीच त्याच्या मनगटात असते."

संकल्प भूमी: अश्रूंमधून जन्मलेला निर्धार

आपण चैत्यभूमी आणि दीक्षाभूमीबद्दल जाणतोच, पण 'संकल्प भूमी' हा डॉ. बाबासाहेबांच्या आयुष्यातील एक अत्यंत भावूक आणि महत्त्वाचा टप्पा आहे.

बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेबांना शिष्यवृत्ती देऊन परदेशात शिक्षणासाठी पाठवले होते. शिक्षण पूर्ण करून परतल्यावर अटीनुसार ते बडोद्यात नोकरीसाठी आले. मात्र, विद्वत्ता असूनही केवळ जातीमुळे त्यांना तिथे राहण्यासाठी जागा नाकारण्यात आली. जेव्हा त्यांना एका सार्वजनिक बागेत आश्रय घ्यावा लागला आणि तिथूनही अपमानित होऊन बाहेर पडावे लागले, तेव्हा एका झाडाखाली बसून बाबासाहेबांचे डोळे पाणावले.

त्या गळणाऱ्या अश्रूंमधूनच एका महान संकल्पाचा जन्म झाला: "जर माझी अवस्था अशी असेल, तर माझ्या सामान्य बांधवांचे काय हाल होत असतील? जोपर्यंत मी माझ्या समाजाला मनुष्य म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देत नाही, तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही." आज तो बगीचा आणि ते झाड या ऐतिहासिक संकल्पाची साक्ष देत 'संकल्प भूमी' म्हणून ओळखले जाते.

समतेचा संघर्ष आणि धम्मचक्र प्रवर्तन

बाबासाहेबांचा लढा केवळ शब्दांचा नव्हता, तर तो कृतीचा होता:

1927 चा महाड सत्याग्रह: चवदार तळ्याचे पाणी सर्वांसाठी खुले केले.

काळाराम मंदिर प्रवेश: सामाजिक समतेसाठी दिलेला लढा.

गोलमेज परिषद: दलितांच्या आणि महिलांच्या हक्कांची सनद मांडली.

धम्म स्वीकार: "मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही," हा निर्धार करून त्यांनी समताप्रधान बौद्ध धम्माचा स्वीकार केला.

ज्ञानाचा महासागर आणि संविधानाचे शिल्पकार

डॉ. बाबासाहेबांची विद्वत्ता अफाट होती. 1952 मधील त्यांच्या भाषणाने परदेशी विचारवंतही थक्क झाले होते. "तुम्ही हे सर्व कसे लक्षात ठेवता?" या प्रश्नावर त्यांचे उत्तर होते, "मी पुस्तकांच्या पानात राहतो, म्हणून मला हे सर्व सुचते."

मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी अनेक देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास केला. ॲडम स्मिथ, कार्ल मार्क्स यांच्या विचारांचे मर्म त्यांना ठाऊक होते. जगातील अनेक तज्ज्ञ असतानाही केवळ बाबासाहेबांनाच 'शिल्पकार' म्हटले जाते, कारण त्यांच्याइतका व्यासंग आणि पीडितांच्या वेदनेची जाण असणारा दुसरा अभ्यासक नव्हता.

निष्कर्ष

सॉक्रेटिसला विष प्यावे लागले, गॅलिलिओला सत्यासाठी छळ सोसावा लागला, त्याचप्रमाणे बाबासाहेबांनीही समाजकंटकांचा आणि व्यवस्थेचा संघर्ष झेलला. पण त्यांनी सत्याची आणि समतेची वाट सोडली नाही. त्यांनी जो संकल्प केला, तो भारतीय संविधानाच्या रुपाने पूर्णत्वास नेला आणि देशाला समतेच्या सूत्रात गुंफले. अशा या महामानवाचे विचार आजच्या पिढीने आचरणात आणणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**लेखिका : श्रीमती टिळेकर नागम्मा रामराव,(जि. प. कें. प्रा. शा. होळ, ता. केज, जि. बीड)**

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे भारतीय लोकशाहीचा डंका जगात.



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजेत.स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ,तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुर्यासारखे लखलखायला लागले.जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले व लोकशाही निर्माण केली.आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो.आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते.परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली.कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे.परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद,पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले.आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते.कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे.त्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही. त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे.कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करु शकले नाही. आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने गर्भश्रीमंत होते.आज प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे.कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे.त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो.परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे.याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर,ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी व विचारवंत देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व 1947 ला भारत स्वतंत्र झाला.परंतु गेल्या काही वर्षांत मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वाममार्गाने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती कमवुन देशाच्या 140 कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या,महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे. याचे दु:ख बाबासाहेबांना अवश्य होत असेल. स्वत:ला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी.असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल.कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे.त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे.कारण बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस निसर्गाचा ह्रास होत आहे. त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.त्यामुळे 14 एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार )**

# संसदीय लोकशाहीचे जनक : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि संसदीय लोकशाहीचे जनक म्हणून ज्या महामानवाला संपूर्ण जगात ओळखले असे भारतरत्न डॉ.भीमराव रामजी आंबेडकर यांचा आज 14 एप्रिल जन्म दिवस.

भारत देशात असलेली संसदीय लोकशाही ही संपूर्ण जगामध्ये सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. कारण सर्वात जास्त मतदार हे भारत देशात असल्यामुळे आणि आपल्या देशामध्ये संसदीय लोकशाही असल्यामुळे भारत देश हा जगातील एकमेवाद्वितीय संसदीय लोकशाही असलेला सर्वात मोठा देश म्हणून गणला जातो.



लोकशाहीमुळे सर्वसामान्य ते सर्वात श्रीमंत असलेल्या व्यक्तींनाही एकच कायदा आहे. त्यामुळे येथे कायद्याने सर्व सम-समान आहेत. जेवढा अधिकार पंतप्रधानांना आहे तेवढाच अधिकार ग्रामपंचायत मध्ये वावरत असलेल्या छोट्यात-छोट्या नागरिकालाही तोच अधिकार या संसदीय लोकशाहीमध्ये मिळालेला आहे. त्यामुळे हा हिंदुस्थान आज जो स्थिर देश आणि विकसनशील देश म्हणून या देशाकडे पाहिले जाते.

या आपल्या भारत देशात या संसदीय लोकशाही स्वीकारण्यामध्ये सिंहाचा वाटा उचलणारे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्म 14 एप्रिल 1891, महू, मध्य प्रदेश येथे झाला. रामजी व भीमाबाई यांचे ते 14वे अपत्य.

त्यांनी 1924 बहिष्कृत हितकारिणी सभा, 1927 महाड चवदार तळे सत्याग्रह. पाणी पिण्याचा हक्क मिळवला,1930 काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह नाशिक, पुणे करार. गांधीजींशी राखीव जागांवर समझोता. 1936 स्वतंत्र मजूर पक्ष स्थापना,1942 मजूर मंत्री अशी विविध प्रकारची कार्य करत वांचित आणि असंघटीत समाजासाठी कामे करत असताना देश एकसंघ कसा राहील यावर त्यांनी आपली जीवाची बाजी लावली.

29 ऑगस्ट 1947 रोजी मसुदा समितीचे अध्यक्ष झाले. 2 वर्ष 11 महिने 18 दिवस काम करून जगातील सर्वात मोठे लिखित संविधान दिले.

अशा या विश्वरत्नास जयंतीनिमित्त कोठी कोठी वंदन...

-----------------

**दिनकर जाधव**
**7083272777**



# “शोषितांचे तारणहार, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर”



भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांनी केवळ आपल्या काळावर नाही, तर येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या विचारांवर आणि जीवनावर कायमस्वरूपी ठसा उमटवला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच एक महान व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी आपल्या असामान्य बुद्धिमत्तेच्या, अथक परिश्रमांच्या आणि तेजस्वी जिद्दीच्या जोरावर समाजातील शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी झाला. अत्यंत कठीण आणि प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. समाजातील अस्पृश्यतेच्या भयानक प्रथेमुळे त्यांना अनेक अपमान आणि अन्याय सहन करावे लागले. परंतु या अडचणींनी त्यांना खचवले नाही, उलट त्यांनी शिक्षणाला शस्त्र मानून अन्यायाविरुद्ध लढण्याचा निर्धार केला. कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्ससारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांमधून उच्च शिक्षण घेऊन त्यांनी ज्ञानाची प्रचंड संपत्ती मिळवली.

डॉ. आंबेडकर यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे भारतीय राज्यघटनेची निर्मिती. स्वतंत्र भारताला एक सशक्त, लोकशाही आणि न्याय्य व्यवस्था देण्यासाठी त्यांनी संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांची पुस्तिका नसून ती प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय देणारी एक महान दस्तऐवज आहे. “समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता” या मूल्यांवर आधारित संविधान हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे.

शोषित आणि वंचित समाजासाठी बाबासाहेबांनी केलेला संघर्ष अतुलनीय आहे. त्यांनी समाजातील अन्यायकारक रुढी-परंपरांना कठोरपणे विरोध केला आणि सामाजिक समतेसाठी आवाज उठवला. महाड चवदार तळे सत्याग्रह, नाशिकचा कालाराम मंदिर प्रवेश आंदोलन अशा अनेक चळवळींमधून त्यांनी समान हक्कांसाठी लढा दिला. त्यांच्या या संघर्षामुळे समाजात जागृती निर्माण झाली आणि शोषित घटकांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा मिळाली.

शिक्षण हेच परिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. त्यांनी शिक्षणाला केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन न मानता, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम मानले. म्हणूनच त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करून दुर्बल घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

डॉ. आंबेडकर हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक प्रख्यात अर्थतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि दूरदर्शी राजकारणीही होते. त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर सखोल अभ्यास करून विविध धोरणात्मक सूचना केल्या. कामगारांचे हक्क, महिलांचे अधिकार आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांनी अनेक कायदे आणि धोरणे तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

महिलांच्या सक्षमीकरणासाठीही त्यांनी मोठे कार्य केले. महिलांना समान हक्क, शिक्षण आणि स्वातंत्र्य मिळावे यासाठी त्यांनी ठोस पावले उचलली. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महिलांना संपत्तीवरील हक्क मिळवून दिला. त्यांच्या या कार्यामुळे भारतीय समाजात महिलांच्या स्थितीत सकारात्मक बदल घडून आला.

डॉ. आंबेडकर यांचे जीवन हे संघर्ष, जिद्द आणि आत्मविश्वासाचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी कधीही अन्यायासमोर झुकणे स्वीकारले नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान हक्क आणि सन्मान मिळावा, हीच त्यांची जीवनाची प्रेरणा होती. त्यांनी दिलेले विचार आणि तत्त्वज्ञान आजही समाजाला मार्गदर्शन करत आहेत.

आजच्या काळात बाबासाहेबांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. समाजात अजूनही असमानता, अन्याय आणि भेदभावाचे काही अंश दिसून येतात. अशा वेळी त्यांच्या विचारांचा अवलंब करून समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करणे ही आपली जबाबदारी आहे. केवळ त्यांच्या जयंतीला अभिवादन करून चालणार नाही, तर त्यांच्या विचारांना आपल्या आचरणात आणणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेला मार्ग हा केवळ एका समाजासाठी नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी दिलेल्या संविधानामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाला समान हक्क आणि संधी मिळाली आहे. त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने “शोषितांचे तारणहार” आणि “भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार” म्हणून ओळखले जातात.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला आणि विचारांना विनम्र अभिवादन.

“शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा संदेश अंगीकारून, आपण सर्वांनी मिळून एक सक्षम, समतावादी आणि उज्ज्वल भारत घडवूया.

**- लेखक : ॲड. शंकर चव्हाण,** अधिवक्ता, उच्च न्यायालय, मुंबई तथा प्रदेशाध्यक्ष जनहित लोकशाही पार्टी, महाराष्ट्र राज्य (9769759737)



# भारतीय स्त्रियांचे उद्धारक, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**आजचा दिवस हा भारतीय समाजातील तमाम शोषित, वंचित घटकांसाठी सोनियाचा दिवस आहे.हजारो वर्षापासून या समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक जोखडात खितपत पडलेल्या वर्गाला आत्मसन्मानाचा मार्ग दाखविणाऱ्या ज्ञानसुर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती.**

बाबासाहेबांचे भारतीय समाजावर अनंत उपकार आहेत.मानवतेचे पूरस्कर्ते असलेल्या बाबासाहेबांनी आपले सबंध आयुष्य सामाजिक समतेसाठी अन्यायाविरुद्ध लढण्यात खर्ची घातले.त्यांना मिळालेल्या 65 वर्षाच्या आयुष्यात त्यांनी केलेले अमर्याद वाचन, प्रचंड लेखन, अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी उभारलेले विभिन्न लढे, चुकीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेच्या विरुद्ध घेतलेल्या भूमिका, जातीयता निर्मूलनासाठी केलेली कार्य आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आज ज्या राज्यघटनेच्या मार्गदर्शनावर आपला देश चालतो आहे आणि आपल्या सर्वांना ज्या घटनेच्या माध्यमातून समानतेचा अधिकार प्राप्त झाला आहे ती घटना निर्मितीसाठी जे परिश्रम घेतले आहेत त्याला जगात कोठेही तोड नाही.या व्यतिरिक्त बाबासाहेबांचे अर्थशास्त्रीय विचार, परराष्ट्र धोरणा विषयीचे विचार, धर्म विषयक विचार हे भारतीय समाजासाठी बहुमूल्य ठेवा आहे.

उपेक्षितांना न्याय आणि सन्मान मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले होते.भारतीय समाज व्यवस्थेने धर्माचा आधार घेऊन समाजातील दोन घटकांवर प्रामुख्याने प्रचंड मोठा अन्याय केला होता. त्यातील पहिला वर्ग म्हणजे अस्पृश्यवर्ग आणि दुसरा वर्ग म्हणजे स्त्री वर्ग होय. अस्पृश्य वर्गाच्या मुक्तीसाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले आहे ते अद्वितीय आहे.पण त्या बरोबरच हिंदू समाज व्यवस्थेने उपेक्षित ठेवलेल्या स्त्री वर्गाच्या मुक्तीचे कार्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. आपल्या समाजात होणारा जातीय अन्याय आणि स्त्रियांवर होणारा अन्याय या मागचे मूळ कारण एकच असून या दोन्ही गोष्टी एकमेकात गुंतलेल्या आहेत असे बाबासाहेबांचे मत होते.

*उपेक्षितांच्या मुक्तीसाठी मनुस्मृतिदहन*.

1927 ला झालेल्या महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहाची भारताच्या आधुनिक इतिहासातील क्रांतिकारी घटना म्हणून नोंद आहे.या समाजातील जातीयता, अस्पृश्यता आणि स्त्रियांविरुद्धच्या अनिष्ट चालीरीती या मनुस्मृती सारख्या अन्यायकारी धार्मिक ग्रंथाच्या माध्यमातूनच टिकून आहेत हे बाबासाहेबांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी चवदार तळ्याच्या सत्याग्रहावेळी या अन्यायकारी धर्मग्रंथाचे दहन केले.आणि त्या द्वारे अस्पृश्यतेच्या विरुद्ध आणि स्त्रियांच्या अन्यायाविरुद्ध रणशिंग फुंकले. ( बाबासाहेबांनी अतिशय विचारपूर्वक स्मृतीदहनाची कृती केलेली आहे. परंतु शरद पोंक्षे सारख्या लोकांना वाटत तसे नाही हे त्यांचे अज्ञान आहे की विकृती आहे हे समजणे एवढे लोक शहाणे झाले असतील अशी अपेक्षा आहे.....).



*स्त्री शिक्षणाचे महत्व *.

एखाद्या देशाच्या प्रगती विषयीचे परिमाण ठरवताना ‘ज्या देशात स्त्रियांची प्रगती झालेली असेल तोच देश प्रगत मानावा’ असे बाबासाहेबांचे मत होते. स्त्रियांना जर धार्मिक अज्ञान आणि अनिष्ट सामाजिक रुढी परंपरेच्या जोखडातून बाहेर पडायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणाला वाघिणीचे दूध मांडणारे बाबासाहेब पुरुषाएवढेच स्त्रियांसाठीही शिक्षण महत्त्वाचे मानतात. जीवनातील अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी आणि आत्म उन्नतीसाठी शिक्षण हेच माध्यम आहे असे बाबासाहेबांचे मत होते. महाडच्या सत्याग्रहा वेळी स्त्रियांना उद्देशून भाषण करीत असताना आत्ता उन्नतीसाठी आपल्या मुलींना शिक्षण द्या असा संदेश त्यांनी दिला.

*हिंदू कोड बिल 1947*.

हिंदू धर्मशास्त्रात अस्पृश्य बरोबरच स्त्रियांचेही सर्व अधिकार नाकारलेले होते. जगाला समानतेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध आणि स्त्री मुक्तीचे पुरस्कर्ते महात्मा ज्योतिबा फुले या दोन्ही महात्म्यांना बाबासाहेब गुरु मानत होते. त्यामुळे त्यांच्या मनात स्त्रियांविषयी सन्मानाची भावना होती. भारतातील स्त्री स्वातंत्र्य, स्त्रियांचा सन्मान आणि स्त्रियांचे अधिकार यांचा पाया बाबासाहेबांनीच रचला आहे. त्यांचे स्त्रीविषयक योगदान हे केवळ अस्पृश्य समाजातील स्त्रिया येवढेच मर्यादित नसून संपूर्ण भारतीय समाजातील स्त्रियांच्या जीवनाला नवीन दिशा देणारे होते. हिंदू कोड बिल हे भारतीय स्त्रियांना बाबासाहेबांनी दिलेली सर्वात मोठी भेट आहे. स्वतंत्र भारताचे कायदामंत्री झाल्यानंतर त्यांनी स्त्रियांना हक्क मिळवून देणारे हिंदू कोड बिल संसदेत सादर केले. या बिलाद्वारे भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच स्त्रियांना विवाह, घटस्फोट, वारसा, संपत्ती या सर्वांवर हक्क सांगणारा कायदा करण्याची तरतूद करण्यात आली होती. परंतु दुर्दैवाने त्यावेळी हे बिल पास होऊ शकले नाही त्यामुळे बाबासाहेबांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. आजच्या परिस्थितीत भारतीय स्त्रियांना हिंदू कोड बिल च्या तरतुदीतून जे संविधानिक अधिकार प्राप्त झाले आहेत ती केवळ बाबासाहेबांची देण आहे हे भारतीय महिलांनी विसरता कामा नये.

*स्त्रियांचे संविधानिक अधिकार*.

सामाजिक न्यायाची संकल्पना ही पाश्चात्य राष्ट्राकडून भारतात आलेली आहे. परंतु त्याच युरोपातील स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. तो मिळवण्यासाठी त्यांना खूप मोठा संघर्ष करावा लागला होता. परंतु भारताच्या स्वातंत्र्यानंतर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांनी कोणतीही मागणी न करता त्यांना मतदानाचा अधिकार बहाल केला होता. या बरोबरच भारताच्या संविधानात स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच समान अधिकार दिले गेलेले आहेत. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान काम समान वेतनाचा अधिकार आहे. कामगार मंत्री असताना बाबासाहेबांनी स्त्रियांना 21 दिवसांच्या मातृत्व रजेचा अधिकार दिला आहे. त्यामुळे स्त्रियांना आरोग्य सुविधा आणि रोजगार सुरक्षितता मिळालेली आहे.

कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवर अवलंबून असते यावर बाबासाहेबांचा विश्वास होता. प्रत्येक स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व आहे तिला पुरुषाच्या दयेवर जगण्याची गरज नाही असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांनी बालविवाह, बहुपत्नी विवाह यासारख्या अनिष्ट रुढींच्या विरुद्ध कठोर भूमिका घेतली होती. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. परंतु दुर्दैवाने बहुजन समाजातील खूप मोठा वर्ग बाबासाहेबांच्या स्त्रीविषयक कार्याबद्दल अनभिज्ञ आहे. काही प्रमाणात उच्च वर्णीय स्त्रिया आणि काही प्रमाणात दलित स्त्रियांना बाबासाहेबांच्या स्त्रीविषयक योगदानाची जाण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात धार्मिक जोखडांनी बांधून टाकलेल्या स्त्रियांना बाबासाहेबांनी संविधानिक अधिकाराच्या रुपात नवीन पंख दिले आहेत. त्यामुळेच भारतीय समाजातील स्त्रीवर्ग आज प्रगतीपथाच्या मार्गावर अग्रेसर असलेला आपण पाहू शकतो आहोत. महामानव, ज्ञानसूर्य, भारतरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 135 व्या जयंतीनिमित्त तमाम भारतीयांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा...................

**प्रा. डॉ. अर्चना रामचंद्र चव्हाण,**
मराठी विभाग प्रमुख तथा माजी प्राचार्या, वैद्यनाथ कॉलेज परळी वैजनाथ

## ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली

### ➡ परळी शहरात मतदार यादी पुनरीक्षणचे 80 टक्के काम पूर्ण

# राहिलेल्या मतदारांनी लवकरात लवकर मॅपिंग करून घ्यावे- प्रा. पवन मुंडे







परळी वैजनाथ (प्रतिनिधी) राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सूचनेवरुन परळी वैजनाथ शहरात रविवार आणि सोमवार असे दोन दिवस मतदार पुनरावलोकन आणि मॅपिंग शिबीर घेण्यात आले. या शिबीराला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असुन मॅपिंगचे 80 टक्के काम पूर्ण झाले असल्याची माहिती भाजपचे बिएलए विधानसभा प्रमुख तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी दिली आहे. राहिलेल्या मतदारांनी लवकरात लवकर मॅपिंग करून आपले मतदार यादीतील नाव कायम ठेवावे असे आवाहनही त्यांनी केले.

बनावट व दुबार मतदारांची नावे वगळण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार याद्यांची संक्षिप्त सखोल चौकशी (एसआयआर) शहरात आणि तालुक्यात गतीने सुरु आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एप्रिल महिन्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत 2002 नंतर स्थलांतरित झालेले मतदार, इतर तालुके किंवा जिल्ह्यांतून आलेले नागरिक यांचा समावेश करण्यात येत आहे. ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सूचनेवरुन शहरात रविवार आणि सोमवार असे दोन दिवस प्रत्येक बुथवर मतदार पुनरीक्षण मॅपिंग शिबीर घेण्यात आले. दोन दिवस प्रत्येक बुथवर अगदी निवडणुकीत थांबतात तसे थांबून भाजपा कार्यकर्त्यांनी मॅपिंग करून घेतले. नागरिकांना मतदान केंद्रावर बोलावून आवश्यक ती कागदपत्रे जमा करून मॅपिंग करून घेतले. शासकीय बिएलओसुध्दा मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. मतदारांनी मतदान करताना थांबतात तसे थांबून मॅपिंग करून घेतले. शहरात 80 टक्क्यांपेक्षा जास्त मॅपिंग झाले असल्याचे भाजपचे बिएलए विधानसभा प्रमुख तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी सांगितले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेवरुन सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांनीही अगदी निवडणुकीत घेतात तशी मेहनत घेऊन मतदारांचे मॅपिंग करून घेतले. कार्यकर्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल प्रा. पवन मुंडे यांनी आभार व्यक्त केले.

*राहिलेल्या मतदारांनी लवकरात लवकर मॅपिंग करुन घ्यावे*

मतदार पुनरीक्षण मॅपिंग राहिलेल्या नतदारांनी लवकरात लवकर मॅपिंग करुन घ्यावे. कारण मॅपिंग केले नाही तर मतदार यादीतून नाव कायमचे वगळले जाणार आहे. नाव वगळले तर पुन्हा यादीत नाव घेण्याची प्रक्रिया अतिशय किचकट आहे. विशेष म्हणजे मतदार यादीतून नाव वगळले तर शासकीय, निमशासकीय सवलतींचा फायदा मिळत नाही. त्यामुळे राहिलेल्या सर्व मतदारांनी लवकरात लवकर आपापल्या बिएलओकडून आपले मॅपिंग करून घ्यावे असे आवाहन प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.


## जाहिर प्रगटन

परळी व परळी तालुकात्यातील व राज्यातील सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की आमचे पक्षकार राजाभाऊ श्रीराम फड रा. कन्हेरवाडी ता. परळी वै जि.बीड यांनी आमच्या ऑफिसवर येवून माहिती सुचना, कागदपत्रे देवून व अधिकार दिल्यावरून पुढील प्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येते

आमचे पक्षकार यांनी रत्नाकर माणिकराव गुट्टे यांच्याकडून मौजे परळी वै येथील नगर परिषद कक्षेतील सिटी सर्वे क्र.६६८८/१ मधील क्षेत्र ४८६४.७५ चौरस मिटर ज्याच्या पुर्वेस सिटी सर्वे नंबर ६८८/२ पश्चिमेस सिटी सर्वे नंबर ६७५,६७३,६७२,६७१,६७०,६६९,६६७ दक्षिणेस कावेरी प्लॉझा ते घरणीकर रोड उत्तरेस हमालवाडी गल्ली जाणारा रस्ता तसेच सिटी सर्वे नंबर ६८८/४ मधील २२१६.१७ चौरस मिटर ज्याच्या पुर्वेस–सिटी सर्वे नंबर ६८८/५ पश्चिमेस – सिटी सर्वे नंबर ६८८/३, दक्षिणेस कावेरी प्लॉझा ते घरणीकर रोड व उत्तरेस–सिटी सर्वे नंबर ६६९,६९२ मधील जागा तसेच सिटी सर्वे नंबर ६८८/६ मधील १०११.७० चौरस मिटर ज्याच्या पुर्वेस नाला, पश्चिमेस सिटी सर्वे नंबर ६८८/५ दक्षिणेस–कावेरी प्लॉझा ते घरणीकर रोड, उत्तरेस सिटी सर्वे नंबर ६९१ मधील जागा वरील चतु:र्सिमेच्या आतील तीन्ही सिटी सर्वे क्रमांक मधील जागा खरेदीखत अ.क्र.२०४७/२०२० अन्वये दिनांक ११/०९/२०२० रोजी खरेदी घेतलेल्या आहेत तेंव्हापासून आमचे पक्षकार मालक ताबेदार आहेत.

परळी व परळी परीसरातील लोक आमच्या पक्षकाराच्या जागेलत किंवा जागेमध्ये दाखवून जागा विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

तरी परळी व परळी परिसरातील सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या पक्षकाराच्या वरील जागेची शासकिय मोजणी केलेली आहे व कोणीही आमच्या पक्षकाराच्या वरील जागेलगत शासकिय मोजनी न करता कोणीही खरेदीविक्रीचा व्यवहार करू नये केला तर त्याची सर्वस्वी जवाबदारी घेणार व देणार यांचेवर राहिल. करीता हे जाहिर प्रगटन दिले खरे असे फक्त. या जाहिर प्रगटनाचा खर्च रक्कम रू ५०००/– आपणावर राहिल.

**मार्फत :**
**ॲड.एस.एम.मुंडे**
**न्यायालय परळी वै.**
**मो.९९२२२६१४९०**

**जाहिर प्रगटन देणार,**
**राजाभाऊ श्रीराम फड**
**रा. कन्हेरवाडी ता.परळी वै. जि.बीड**
**मो.नं. ९६०४१७७७७७**

## जाहिर प्रगटन

परळी व परळी तालुकात्यातील व राज्यातील सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की आमचे पक्षकार राजाभाऊ श्रीराम फड रा. कन्हेरवाडी ता. परळी वै जि. बीड यांनी आमच्या ऑफिसवर येवून माहिती सुचना, कागदपत्रे देवून व अधिकार दिल्यावरून पुढील प्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येते.

आमचे पक्षकार यांनी स्वाती सतिश मुंडे यांच्याकडून खरेदीखत नं. १६९६/२०२३ अन्वये मौजे परळी वै येथील नगर परिषद कक्षेतील सिटी सर्वे क्र. ६८८/१ मधील क्षेत्र ५७५२.९१ चौरस मिटर खरेदी घेतलेली आहे ज्याच्या पुर्वेस सिटी सर्वे नंबर ६८८/२ मधील खुल्ली जागा, पश्चिमेस सोमनाथ हलगे यांची जुनी कावेरी प्लॉज व लिहून घेणार राजाभाऊ फड यांची सिटी सर्वे नंबर ६८८/१ मधील खुल्ली जागा, दक्षीणेस कावेरी प्लाझा घरणीकर जाणार रस्ता, उत्तरेस हमालवाडी गल्लीकडे जाणारा रस्ता अशा आहेत. खरदीखताच्या तारखेपासून आमचे पक्षकार मालक ताबेदार आहेत.

परळी व परळी परीसरातील लोक आमच्या पक्षकाराच्या जागेलगत किंवा आमच्या पक्षकाराची जागा दाखवून जागा विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

तरी परळी व परळी परिसरातील सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या पक्षकाराच्या वरील जागेची शासकिय मोजणी केलेली आहे व कोणीही आमच्या पक्षकाराच्या वरील जागेलगत शासकिय मोजनी न करता कोणीही खरेदीविक्रीचा व्यवहार करू नये केला तर त्याची सर्वस्वी जवाबदारी घेणार व देणार यांचेवर राहिल. करीता हे जाहिर प्रगटन दिले खरे असे फक्त.या जाहिर प्रगटनाचा खर्च रक्कम रू ५०००/–आपणावर राहिल.

**मार्फत :**
**ॲड.एस.एम.मुंडे**
**न्यायालय परळी वै.**
**मो.९९२२२६१४९०**

**जाहिर प्रगटन देणार,**
**राजाभाऊ श्रीराम फड**
**रा. कन्हेरवाडी ता.परळी वै. जि.बीड**
**मो.नं. ९६०४१७७७७७**




# अथांग विद्वतेचा महासागर डॉ.बाबासाहेब आंबेडकर

महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक अलौकीक बुद्धीमत्ता लाभलेले असामान्य असे व्यक्तीमत्व होते. त्यामुळे त्यांच्या ठायी असलेल्या प्रकांड विद्वतेच्या जोरावर त्यांनी सर्वच क्षेत्रात विशेष उल्लेखनिय कार्य करून संपूर्ण विश्वच दिपवून टाकले आहे. म्हणूनच आज जगभर सर्वत्र डॉ.बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार होत आहे.

वास्तविक ज्या भारतीय समाज व्यवस्थेत डॉ.बाबासाहेबांचा जन्म झाला ती समाज व्यवस्था पूर्णपणे विषमतेवर आधारीत, प्रचंड भेदभाव व जातीयता बाळगणारी होती. त्यामुळे या देशातील करोडो मागासवर्गियांचे जीवन अत्यंत हालाखित व गुलामगिरीत पशु प्राण्यांपेक्षाही वाईट होते. प्रस्थापितांनी त्यांच्यावर अमानुष अन्याय व अत्याचार केले होते. त्यांचे सर्व प्रकारचे हक्क व अधिकार हिसकावून घेवून त्यांना प्रचंड दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा व कर्मकाडांत गाढून टाकले होते. याही पेक्षा विशेष म्हणजे शिक्षणापासून त्यांना जाणिवपूर्वक दूर ठेवले होते. त्यामुळे मागासवर्गियांना कुठेच संधी व वाव नव्हता.

अशा या महाभयकंर विषम सामाजिक परिस्थितीमध्ये डॉ.बाबासाहेबांचा जन्म झाला होता. त्या भारतीय समाजाला जागे करण्याचे महत्वपूर्ण काम डॉ.बाबासाहेबांनी आपल्या हाती घेतले तेव्हा त्यांनी सर्वप्रथम तमाम मागासवर्गियांचे, दुःखीतांचे, पिडीतांचे, शोषितांचे दुःख व यातना कमी करण्यासाठी त्यांना दारिद्रय व अंधश्रेदधेच्या विळख्यातून बाहेर काढून समाजातील प्रचंड विषमता दूर करण्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय व मार्ग असल्याचे संशोधन करून शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले.

स्वतः डॉ.बाबासाहेबांनी अगदी लहान वयापासून विद्येवर अपार प्रेम केले होते. विद्येला त्यांनी आपल्या तीन उपास्य दैवतांपैकी पहिले उपास्य दैवत मानून सदैव विद्येची आराधना केली. आयुष्याच्या शेवटपर्यंत विद्येवर निस्सिम प्रेम करणारे डॉ.बाबासाहेबांसारखे व्यासंगी व्यक्तीमत्व आज पावेतो या जगात जन्मास आले नाही. कारण त्यांनी पुस्तकावर, ग्रंथावर एवढे प्रेम केले की एकदा का ते वाचनात रममान झाले की त्यांना कशाचेह ही भान राहत नसे. त्यांची ज्ञानार्जणाची भूक एवढी प्रचंड होती की तिच्यापूढे अक्षरशः ते तहान भूक ही विसरून जात असत. एवढेच काय पण आपल्यासाठी आपली पत्नी उपासी राहिली याचे ही भान त्यांना राहत नसे. कारण एकदा का डॉ.बाबासाहेब वाचनात रममान झाले की 18/18 ते 20/20 तास ते वाचनातच रमत असत. त्याचे कारणही तसेच होते कारण याच अभ्यासातून व ज्ञानातून त्यांना आपल्या लाखो, करोडो मागासवर्गियांना गुलामगिरीतून, विषमतेच्या दलदलीतून बाहेर काढून त्यांना मानवी हक्क व अधिकार मिळवून द्यायचे होते. दीन, हीन, पिडीत, वंचित घटनांना न्याय मिळवून द्यायचा होता. स्त्रियांना पुरुषा बरोबरचे हक्क मिळवून देवून त्यांना सन्मान प्राप्त करून द्यायचा होता. एवढेच नाही तर भारत देशाचा सर्वांगिण विकास करून समस्त भारतीयांचे कल्याण व हित करायचे होते. म्हणूनच डॉ.बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण अतिशय महत्वाचा मानून तो ज्ञानांर्जणात घालवला होता.



विशेष म्हणजे डॉ.बाबासाहेबांनी अमेरिका, इंग्लड आदि देशांमध्ये जावून ज्ञानजर्ण करत असतांना अविरतपणे अभ्यास करण्यावरच भर दिला होता. म्हणूनच अमेरिकेत जो अभ्यासक्रम पूर्ण करण्यास एकुण आठ वर्ष एवढा कालावधी लागत असे तो अभ्यासक्रम डॉ.बाबासाहेबांनी केवळ दोन वर्षे व दोन महिन्यात यशस्वीरित्या पूर्ण केला. पण हे करण्यासाठी त्यांना चोविस तासापैकी सतत एक्केविस एक्केविस तास अभ्यास करावा लागत होता. अशा प्रकारे डॉ.बाबासाहेबांनी परदेशात सर्वोच्च पदव्या प्राप्त करतांना एक क्षण ही ऐष-आरामत न घालवता अठरा अठरा ते एक्केविस एक्केविस तास अभ्यास केला. त्यामुळेच त्यांनी एम.ए, पी.एच.डी., डी.एस्सी, एल.एल.डी., डी.लिट., बॅरिस्टर, अॅट लॉ आदि एका पेक्षा एक सर्वोच्च पदव्या तर प्राप्त केल्याच पण त्याबरोबरच त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, नितीशास्त्र, इतिहास, मानववंश शास्त्र अशा अनेक विषयामध्ये विशेष प्रविण्य मिळवले होते. म्हणजेच डॉ.बाबासाहेबांचे विद्या व्यासंग हे प्रचंड दांडगे व्यसन होते. त्यामुळे त्यांनी आपल्या आयुष्यात ग्रंथावर, पुस्तकावर जीवापाड प्रेम केले होते. ते व्यक्त करतांना डॉ.बाबासाहेब असे म्हणतात की ङ्गगङ्घमाझ्या घरावर सावकारी बद्दल जर जप्ती आली व बेलीफाने जर माझ्या पुस्तकाला हात लावला तर मी त्याला गोळी घालून जागच्या जागीच ठार करीनफफ खर म्हणजे पुस्तकावर अशा प्रकारचे प्रेम करणारे महामानव हे केवळ डॉ.बाबासाहेब हेच होते. एवढेच नाही तर कोणताही नवीन ग्रंथ पाहिला की तो वाचनासाठी विकत घेवून आपल्या संग्रही ठेवणे हा तर त्यांचा नित्यांचा छंद होता. म्हणूनच त्यांच्या ग्रंथालया मध्ये विविध विषयावरील व विविध भाषेतील हजारो ग्रंथ होते. मग प्रंसगी पैसे नसले तरी ते मुंबईतील कोणत्याही पुरस्तकाच्या दुकानातून उधारीवर पुस्तके विकत घेत. एवढी दांडगी त्यांची पतसुदधा होती. त्याच्याही पुढे जावून डॉ.बाबासाहेबांनी आपले सर्व ग्रंथ हे सुरक्षित रहावेत केवळ या हेतूनेच मुंबई येथे ङ्गराजगृहफ हा बंगला बांधून त्यात अतिशय भव्य दिव्य असे ग्रंथालय उभे केले होते. अशा प्रकारे ग्रंथावर अतोनात प्रेम करणारे जगातील एकमेव महापुरूष म्हणजे प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय.

खर म्हणजे डॉ.बाबासाहेबांनी ज्या तळमळीने व कठोर परिश्रमाने विद्यार्जण केले व प्रचंड विद्याव्यासंग सतत वाढवला होता. तेवढ्याच पोटतिडकीने व महत प्रयासाने आपल्या गरीब मागासवर्गीयांनी सुद्धा शिक्षण घ्यावे असा त्यांचा ध्यास होता. कारण शिक्षणाशिवाय कोणतेच समाजपरिवर्तन व क्रांती होवू शकत नाही अशी प्रबळ धारणा डॉ.बाबासाहेबांची होती. म्हणूनच त्यांनी केवळ शिक्षणाचा मुलमंत्रच दिला नाही तर समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी मोठ्या पराकाष्टेने मुंबई येथे जुलै 1945 मध्ये ङ्गपिपल्स एज्युकेशन सोसायटीफ ची स्थापना केली व त्याअंतर्गत सिद्धार्थ कॉलेज काढले जे की संपूर्ण भारत देशात एक नामंकित व अग्रगण्य कॉलेज म्हणून सिध्द झाले. पुढे अल्पावधीतच म्हणजे जुन 1950 मध्ये शैक्षणिक क्षेत्रात मागासलेल्या मराठवाड्यातील संभाजीनगर या ठिकाणी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून शिक्षणाची सोय केली. त्यामुळे अनेक गरीब, शोषित, पिडीत विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेवू लागले. अशाप्रकारे डॉ.बाबासाहेबांनी प्रकांड विद्वत्तेच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात न भुतो न भविष्यतीफ असे नेत्रदिपक कार्य करून दाखविले. आपल्या देशातील करोडो मागासवर्गीय, शोषित, पिडीत, वंचित, शेतकरी, शेतमजुर, महिला, अल्पसंख्याक, आदिवासी, भटके, भुमिहिन आदि कितीतरी समाज घटकांना हजारो वर्षाच्या गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करून त्यांना सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थीक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात समानता मिळवून देण्याचे अपूर्व कार्य डॉ.बाबासाहेबांनी केले. एवढेच नव्हे तर प्रचंड विद्वत्ता त्यांच्या ठायी असल्यामुळे या देशाचे संविधान लिहिण्याचे अत्यंत महत्वपूर्ण कार्य देखील डॉ.बाबासाहेबांकडेच आले. तेव्हा त्यांनी शारीरिक स्वास्थ साथ देत नसतांना देखिल राष्ट्रीय कार्याला प्राधान्य देवून आपल्या देशाला एक आदर्श संविधान व संसदीय लोकशाही दिली. हे सर्व काही डॉ.बाबासाहेबांनी त्यांना मिळालेल्या अलौकीक बुद्धीमत्तेच्या व प्रकांड विद्वतेच्या जोरावरच करून दाखवले. म्हणूनच आज त्यांच्या विचारांची व कार्याची दखल संपूर्ण जगाने घेतली आहे. इंग्लड, अमेरिका आदि कितीतरी राष्ट्रांनी डॉ.बाबासाहेबांच्या विद्वतेचा व कार्याचा यथायोग्य असा गौरव केला आहे. अगदी अलीकडे सुद्धा अमेरिका व इग्लंड या देशांनी जेव्हा जगभरातील 100 विद्वानांची यादी तयार केली आहे. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रथम क्रमांक दिला असुन भारतातून ते एकमेव आहेत. विशेष म्हणजे कोलंबिया विद्यापिठाने तर ही यादी एका शिल्पात कोरून विद्यापीठाच्या दर्शनी भागात झळकविण्यात आली आहे. आणि त्या निमित्ताने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या हस्ते कोलंबिया विद्यापीठात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे समारंभपूर्वक अनावरण झाले आहे. या सर्व महत्वपूर्ण बाबींचा आज विचार करता हेच सिध्द होते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे खरोखरच प्रकांड विद्वतेचा अथांग महासागर होते, आहेत आणि सदैव राहतील.



अजयकुमार गंडले 9975973870

# लाख मोलाचं देणं: डॉ. बाबासाहेब आंबेडकर

'देणं' ही संकल्पना व्यवहारात अनेकदा भौतिक तराजूत तोलली जाते. पण जेव्हा हे देणं विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाचे असते, तेव्हा त्याची व्याप्ती काळ आणि अवकाशाच्या पलीकडे जाते. हे देणं केवळ हक्क किंवा अधिकारांचे नाही, तर ते एका मृतवत समाजाला मिळालेला 'प्राणवायू' आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं आयुष्य म्हणजे संघर्षाच्या अग्निदिव्यातून तावून सुलाखून निघालेले एक अस्सल कांचन होते, ज्याची प्रभा आज केवळ वंचितांच्याच नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या प्रत्येक स्तंभाला उजळून टाकत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे 'लाख मोलाचे देणं' केवळ एका समाजघटकापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवी संस्कृतीला मिळालेले एक संचित आहे.

प्रज्ञेचा सूर्य: शिक्षणाकडून शहाणपणाकडे:-


विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं पहिले आणि सर्वात मूलभूत देणं म्हणजे 'विवेकाचे अधिष्ठान'. त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरी मिळवण्याचे साधन मानले नाही, तर ती गुलामगिरीच्या बेड्या तोडणारी 'वाघीण' आहे हे सिद्ध केले. ज्या काळात ज्ञानाच्या वाटा काहींसाठी आरक्षित होत्या, त्या काळात त्यांनी जागतिक स्तरावरील सर्वोच्च ज्ञान आत्मसात करून एक 'प्रज्ञासूर्य' म्हणून स्वतःला घडवले. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा त्यांचा त्रिसूत्री संदेश म्हणजे केवळ घोषणा नव्हती; ती एका वैचारिक क्रांतीची पायाभरणी होती. त्यांनी समाजाला केवळ साक्षर केले नाही, तर स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचे 'शहाणपण' दिले. हे अक्षरांचे शस्त्र आजही अज्ञानाच्या अंधारावर प्रहार करत आहे.

भारतीय संविधान- लोकशाहीचा नैतिक कणा:

भारताला मिळालेले सर्वात महान देणं म्हणजे 'भारतीय संविधान'. हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून तो कोट्यवधी भारतीयांच्या जगण्याचा 'सांस्कृतिक जाहीरनामा' आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रक्ताचे पाणी करून एका अशा भारताचे स्वप्न कागदावर उतरवले, जिथे वंचितांना केवळ मतदानाचा अधिकार मिळाला नाही, तर 'सत्तेत वाटा' मिळाला. न्याय, स्वातंत्र्य आणि समता या त्रयींच्या माध्यमातून त्यांनी हजारो वर्षांची उतरंड मोडीत काढली. सामान्य माणसाच्या हातात असलेले मतदानाचे शस्त्र हे राजवाड्याची सत्ता झोपडीपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. हे संविधान म्हणजे आधुनिक भारताचा 'कणा' आहे.

धम्मक्रांती: आत्मसन्मानाचे नवे क्षितीज:

14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर झालेले धम्मचक्र प्रवर्तन केवळ ऐतिहासिक धर्मबदल नव्हते, तर ते 'माणसाचा माणूस म्हणून झालेलं पुनरुत्थान होतं. शतकानुशतके ज्यांच्या सावलीचा विटाळ मानला गेला, त्यांना बुद्धाच्या करुणेच्या आणि प्रज्ञेच्या प्रकाशात उभे करून बाबासाहेबांनी जागतिक मानवी इतिहासात एक अभूतपूर्व क्रांती घडवली. त्यांनी दिलेला 'धम्म' हा अंधश्रद्धेवर आधारित नसून तो विज्ञानावर आणि मानवी मूल्यांवर आधारित आहे. या धम्मामुळे पिचलेल्या मनांना 'ताठ कणा' मिळाला आणि गुलामीची मानसिकता गळून पडली. हा केवळ आध्यात्मिक मार्ग नव्हता, तर तो एक सामाजिक समतेचा महामार्ग होता.




स्त्रीमुक्ती आणि राष्ट्र उभारणीचे व्यापक दृष्टिकोन:-

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ एका वर्गापुरते मर्यादित करणे हा त्यांच्यावर अन्याय ठरेल. त्यांनी 'हिंदू कोड बिल'च्या माध्यमातून भारतीय स्त्रियांना जे अधिकार दिले, ते आजही त्यांच्या प्रगत विचारांची साक्ष देतात. मालमत्तेचा हक्क, घटस्फोटाचा अधिकार आणि सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला. याशिवाय, कामगारांचे कामाचे तास निश्चित करणे, दामोदर खोरे प्रकल्प, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची संकल्पना यांमधून त्यांच्या 'राष्ट्रनिर्मात्या' रुपाची व्यापकता स्पष्ट होते. त्यांनी प्रत्येक श्वासासोबत देशाच्या प्रगतीचा विचार केला.

राष्ट्रनिर्माता आणि आर्थिक क्रांतीचे जनक:;

डॉ.बाबासाहेबांचे कार्य केवळ सामाजिक क्रांतीपुरते मर्यादित नव्हते, तर ते एका आधुनिक राष्ट्राचे 'आर्थिक शिल्पकार' होते. भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेली 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' ही त्यांच्या 'The Problem of the Rupee' या प्रबंधातील विचारांतूनच साकारली. हे त्यांचे देणं देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी लाख मोलाचे ठरले. जलसंधारण, दामोदर खोरे प्रकल्प आणि वीज निर्मितीच्या माध्यमातून त्यांनी देशाच्या औद्योगिक विकासाची पायाभरणी केली. "पाणी आणि वीज ही राष्ट्राची संपत्ती आहे," हा विचार देऊन त्यांनी भविष्यातील समृद्ध भारताचे स्वप्न पाहिले होते. हे देणं आजही भारताच्या प्रगतीच्या धमन्यांमध्ये रक्तासारखे धावत आहे.

मजूर आणि श्रमिकांचा सन्मान:-

जगातील कामगार चळवळीला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले योगदान हे मानवी हक्कांचे एक सुवर्णपान आहे. मजुरांच्या कामाचे तास 12 वरून 8 वर आणणे, महिला कामगारांना प्रसूती रजा (Maternity Benefit) मिळवून देणे आणि विम्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे; हे त्यांचे उपकार कधीही न विसरता येणारे आहेत. त्यांनी मजुरांना केवळ कष्टकरी मानले नाही, तर त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. आज जो कामगार आत्मसन्मानाने आपल्या कामाच्या जागी उभा आहे, त्या प्रत्येक घामाच्या थेंबात बाबासाहेबांच्या संघर्षाचे मोल साठलेले आहे.

पत्रकारिता: मुका समाज बोलता करणारा शब्दवेध:-

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ कायदे केले नाहीत, तर अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्यासाठी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' यांसारखी वृत्तपत्रे सुरु केली. शब्दांच्या माध्यमातून त्यांनी समाजाच्या सुप्त जाणीवांना जागे केले. हे त्यांचे पत्रकारितेचे देणं म्हणजे विचारांच्या प्रवासातील एक असा दीपस्तंभ आहे, ज्याने उपेक्षितांना स्वतःचा आवाज मिळवून दिला. पत्रकारिता ही केवळ माहिती देण्याचे साधन नसून ती सामाजिक परिवर्तनाचे 'रणशिंग' आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.

वैश्विक मानवाचा आदर्श:-

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे केवळ भौगोलिक सीमांमध्ये बांधलेले नाहीत. ते कोलंबिया विद्यापीठ असो वा लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, जगभरातील विचारवंतांसाठी ते आजही मार्गदर्शक आहेत. त्यांनी दिलेला 'संवैधानिक नैतिकता' (Constitutional Morality) हा विचार आजही जागतिक लोकशाहीसाठी एक आदर्श मानला जातो. जेव्हा एखादा देश आपल्या हक्कांसाठी झगडतो, तेव्हा त्यांना बाबासाहेबांच्या संविधानाचा आधार वाटतो. हे वैश्विक देणं भारताची मान जगासमोर अभिमानाने उंचावणारे आहे.

निसर्ग आणि मानवी मूल्यांचा संगम:-

डॉ.बाबासाहेबांनी ज्या धम्माचा स्वीकार केला, तो निसर्ग आणि मानवी मूल्यांचा परिपाक होता. त्यांनी माणसाला निसर्गाशी आणि स्वतःच्या विवेकाशी जोडले. त्यांचे देणं म्हणजे केवळ कायदेशीर हक्क नाहीत, तर ते एक 'जीवन जगण्याची कला' (Way of Life) आहे. ज्यामध्ये करुणा, प्रज्ञा आणि मैत्री यांचा त्रिवेणी संगम आहे. या विचारांनी माणसाला क्रूरतेपासून करुणेकडे नेले, हीच त्यांची खरी सामाजिक किमया आहे.

वैचारिक वारसा आणि नवी पिढी:-

आज विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं देणं कोणत्या स्वरुपात आपल्यासमोर आहे? ते आहे—विज्ञानावर आधारित दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि अखंड राष्ट्रप्रेम. त्यांनी आपल्याला शिकवले की, "राष्ट्र हे केवळ भूभाग नसून तो एक मानसिक आणि भावनिक अनुबंध आहे." आजची पिढी जेव्हा तंत्रज्ञानाच्या युगात आपली ओळख शोधत आहे, तेव्हा डॉ.बाबासाहेबांचे विचार त्यांना स्थिर राहण्यासाठी नैतिक बळ देतात. त्यांनी दिलेली ही 'वैचारिक शिदोरी' कधीही न संपणारी आणि काळाच्या ओघात अधिक झळाळून निघणारी आहे.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला काय दिले? त्यांनी आपल्याला 'जगण्याचे प्रयोजन'दिले. त्यांनी दिलेले विचार हे केवळ भूतकाळातील गौरवशाली पाने नाहीत, तर ते भविष्यातील प्रत्येक संकटावर मात करणारे 'दीपस्तंभ' आहेत. जेव्हा एखादा वंचित मुलगा पुस्तक हातात घेऊन जागतिक स्पर्धेत उतरतो, जेव्हा एखादी स्त्री स्वतःच्या हक्कासाठी खंबीरपणे उभी राहते आणि जेव्हा लोकशाही धोक्यात असताना सामान्य नागरिक संविधानाचा आधार घेतो; तेव्हा खऱ्या अर्थाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या 'लाख मोलाच्या देण्याची' प्रचिती येते. त्यांनी दिलेली ही विचारांची शिदोरी कधीही न संपणारी आहे. ते केवळ एका युगाचे नायक नव्हते, तर ते मानवतेच्या अंतापर्यंत मार्ग दाखवणारे 'विश्ववंद्य' महामानव आहेत!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका काळाचे नायक नव्हते, तर ते युगपरिवर्तक होते. त्यांचे 'लाख मोलाचे देणं' हे केवळ इतिहासाच्या पुस्तकात बंदिस्त नाही, तर ते रोजच्या संघर्षात, मिळणाऱ्या न्यायात आणि जपल्या जाणाऱ्या स्वाभिमानात जिवंत आहे. त्यांनी आपल्याला फक्त हक्क दिले नाहीत, तर त्या हक्कांचे रक्षण करण्याची 'धमक' दिली. त्यांनी आपल्याला फक्त कागदावरचे कायदे दिले नाहीत, तर त्या कायद्यांना जगण्याची 'शक्ती' दिली. आज जेव्हा आपण स्वातंत्र्याचा मुक्त श्वास घेतो, तेव्हा त्या प्रत्येक श्वासात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्यागाचे आणि परिश्रमाचे सुगंध दरवळत असतात. शेवटी, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं देणं म्हणजे— महापरिनिर्वाणा नंतर समाजाच्या जाणीवेत जिवंत राहणारा एक ज्वलंत विचार! जोपर्यंत आभाळाचा निळा रंग कायम आहे, तोपर्यंत या महामानवाचे हे 'लाख मोलाचे देणं' मानवाच्या कल्याणासाठी दीपस्तंभासारखे तळपत राहील.



**प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे,**
**नाट्यशास्त्र विभागप्रमुख,**
**संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी ,**
**जि. जालना**
**संवाद:9823836675**


















## लोकमान्य टिळक महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती उत्साहात साजरी



वडवणी प्रतिनिधी  वडवणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. बी. जी. कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. त्यानंतर विद्यापीठाच्या दिनांक 02 एप्रिल 2026 च्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने दिनांक 12 एप्रिल 2026 रोजी 'सतत अभ्यास अभियान' राबविण्यात आले.

या अभियानाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढविणे व त्यांच्या एकाग्रतेत वाढ करणे हा होता. यानुसार वेळेचे योग्य नियोजन करून ग्रंथालयात विद्यार्थ्यांना एकत्रित बसवून विविध वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. तसेच अभ्यासासाठी अनुकूल आणि शांत वातावरण तयार करण्यात आले.

सदर अभियान यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. भालेराव व श्री. प्रदीप शिंदे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक यांचेही मोलाचे योगदान लाभले.







## मातीतला सन्मान प्रेरणेचा दीपस्तंभ!"



परळी : मूळ गाव परळी येथे आगमन होताच एक भावनिक आणि अभिमानास्पद क्षण अनुभवायला मिळाला. महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस (INTUC) चे मुख्य महासचिव मा. दत्तात्रय दादाराव गुट्टे साहेब यांच्या पतसंस्थेत सदिच्छा भेट देण्याचा योग साधला.

या भेटीदरम्यान गुट्टे साहेबांनी अत्यंत आपुलकीने, सन्मानपूर्वक आणि जिव्हाळ्याने स्वागत करून मानाचा सत्कार केला. हे स्वागत केवळ औपचारिक नसून, मातीतल्या नात्यांची ऊब आणि स्नेह व्यक्त करणारे होते. त्यांच्या हस्ते झालेला सत्कार हा आयुष्यभर स्मरणात राहणारा आणि अभिमानाने सांगावा असा क्षण ठरला.

भेटीदरम्यान कामगार चळवळ, कर्मचारी हित आणि सामाजिक बांधिलकी या विषयांवर सखोल आणि सकारात्मक चर्चा झाली. गुट्टे साहेबांनी दिलेले मार्गदर्शन, व्यक्त केलेला स्नेह आणि दाखवलेला जिव्हाळा पुढील कार्यासाठी प्रेरणादायी ठरला.

मातीतल्या ज्येष्ठ कामगार नेत्यांकडून मिळालेला हा सन्मान मनाला उभारी देणारा असून, समाजासाठी अधिक जबाबदारीने कार्य करण्याची नवी ऊर्जा देणारा ठरला. या सत्कारपूर्वक स्वागताबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

**– आपलाच परळीकर : महादेव चांगिरे**


भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त
दिव्यांग सहाय्यक पोर्टल
मोफत नोंदणी शिबीर
भविष्यातील १५ हजार रुपयांच्या साहित्यासाठी हि नोंदणी आवश्यक आहे.
दि.१४ ते २१ एप्रिल २०२६ वेळ : सकाळी १० ते १
आधार कार्ड
• बँक पासबुक
• महाराष्ट्रातील कायम रहिवासी
• सध्याच्या पत्याचा पुरावा
• दिव्यांग वैशिक ओळखपत्र
• कायम पत्याचा पुरावा
• उत्पन्नाचा दाखला
• जन्म दाखला
• मोबाईल नंबर
पोर्टल नोंदणीचे फायदे आणि लाभ
• शिष्यवृत्ती योजना
• सहाय्यक उपकरणे
• स्वयंरोजगार कर्ज
• प्रशिक्षण आणि रोजगार
• आरोग्य विमा सुविधा
• महामंडळ योजनांची माहिती
नोंदणीसाठी संपर्क
9822280568
डॉ.संतोष मुंडे
उपाध्यक्ष-दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान, महाराष्ट्र राज्य
स्थळ : डॉ.संतोष मुंडे यांचे श्रीनाथ हॉस्पिटल, अरुणोदय मार्केट समोर, परळी वैजनाथ.


संविधान निर्माते
महामानव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३५ व्या
जयंती निमीत्त
सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
राजेश हरिश्चंद्र गित्ते
तालुकाध्यक्ष
भारतीय जनता पार्टी परळी वैजनाथ.


भारतरत्न
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
यांच्या 135 व्या
जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन..।
दत्तात्रय दा गुट्टे
मुख्य महासचिव :-महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस (इंटक)
विश्वस्त :- भविष्य निर्वाह निधी समिती मुंबई.


भारतरत्न
डॉ.
भिमराव
रामजी
आंबेडकर
यांच्या 135 व्या
जयंती निमित्त
विनम्र अभिवादन..।
KALAM KA
BADSHAH
सय्यद हानिफ
उर्फ बहादुरभाई
शहराध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, परळी वैजनाथ


"शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा
एक दिवस वाघ होऊन जगायला शिका"
विश्वरत्न
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन..।
अभिवादक :
सिद्धेश्वर मुंडे
राज्यअध्यक्ष :-महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटना


युगपुरुष,भारतरत्न
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
यांच्या १३५ व्या जयंती निमित्त
हार्दिक शुभेच्छा...
दिपक वैजनाथराव जगतकर
अश्विन शंकरआप्पा मोगरकर


THE ARCHITECT OF
MODERN INDIA..!
भारतरत्न
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन..।
बहुजन विकास मोर्चा मित्र
मंडळ कोठारबन ता.वडवणी
मा. बाबुरावजी पोटभरे
अध्यक्ष बहुजन विकास मोर्चा
मा.बिभीषण डोंगरे
मा. बाबासाहेब वाघमारे
माजी सभापती न. प. वडवणी
डॉ
बाबासाहेब आंबेडकर
यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा


"THE HAND THAT WROTE THE
CONSTITUTION,
IS THE HAND THAT
HOLDS OUR FUTURE"
भारतरत्न
डॉ.
भिमराव
रामजी
आंबेडकर
यांच्या 135 व्या
जयंती निमित्त
विनम्र अभिवादन..।
बाबुराव पोटभरे
राष्ट्रीय ;-अध्यक्ष बहुजन विकास मोर्चा